आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

# वार्षिक अहवाल

## २०२० - २१



आत्मधीरेणे भव!

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

## व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| देवेंद्र फडणवीस | अध्यक्ष |
| डॉ. विनय सहस्रबुद्धे | उपाध्यक्ष |
| विजय (भाई) गिरकर | सचिव |
| अरविंद रेगे | कोषाध्यक्ष |
| प्रा. अनिरुद्ध देशपांडे | सदस्य |
| प्रदीप पांडेय | सदस्य |
| रामस्वामी बालुसुब्रमण्यम | सदस्य |
| रेखा महाजन | सदस्या |
| वी. सतीश | सदस्य |
| श्रीकांत बडवे | सदस्य |
| सुधीर मेहता | सदस्य |

## अधिकारी गण

| | |
|---|---|
| रवींद्र साठे | महासंचालक |
| उमेश मोरे | मुख्य देखभाल व संकुल सेवा अधिकारी |
| देवेंद्र पै | मुख्य शैक्षणिक अधिकारी |

Society Registration Act (Registration No. 618 Bom. /82)
Trust Act (Registration No. F-7863 Bom. /82)
80G - Certificate No. AAATR3174JF20072 Valid upto AY 2026-2027
12A - Certificate No. AAATR3174JE19829 Valid upto AY 2026-2027
● FCRA No. 083780667 ● PAN No.: AAATR3174J
● TAN No.: MUMR16886C ● GST No.: 27AAATR3174J1ZA

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीस २०२०-२१ चा वार्षिक अहवाल सादर करताना अतिशय आनंद होत आहे. गेले पूर्ण वर्ष संपूर्ण विश्व, कोरोना संकटाच्या महामारीमुळे ग्रस्त झाले होते. टाळेबंदीच्या काळात कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सरकारी नियमावलीमुळे प्रत्यक्ष कार्यक्रम घेण्यावर मर्यादा होत्या. परंतू या काळातही प्रबोधिनीच्या वतीने आभासी पद्धतीने अनेक कार्यक्रम योजण्यात आले व प्रबोधिनीने प्रशिक्षणाची शृंखला अखंडपणे सुरु ठेवली. या कार्यक्रमात नेहमीप्रमाणे नाविन्यपूर्णताही होती. लोकमान्य टिळकांच्या स्मृतीशताब्दी वर्षा निमित्त त्यांचे जीवन आणि कार्य यावरील प्रशिक्षण वर्ग, भारतातील पहिली ट्विटर थ्रेड स्पर्धा, पुणे कार्यालयाच्या संस्था बांधणी केंद्रातर्फे योजण्यात आलेले वेध-२०२०, ऑनलाईन अध्यापन तंत्र, अभिवाचन कार्यशाळा हे गेल्या वर्षातील काही वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम.

अहवाल वर्षात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांची प्रबोधिनीच्या अध्यक्षपदी झालेली निवड, ही एक उल्लेखनीय घटना. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रबोधिनी आणखी सफल वाटचाल करेल यांत शंका नाही.

## अहवाल वर्षातील कार्यक्रम - संख्यात्मक वृत्त

| क्र. | कार्यक्रम | | कार्यक्रम | सहभागी | महिला | पुरुष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | विशेष कार्यक्रम | | ०१ | - | - | - |
| २ | प्रशिक्षण | सामाजिक | ५५ | २२५० | ९४१ | १३०९ |
| | | राजकीय | २० | ७३२ | २० | ७१२ |
| ३. | प्रबोधन | | १३ | ९६५ | ३०८ | ६५७ |
| ४. | संशोधन | सर्वेक्षण | ०३ | ५१४२ | - | - |
| | | संशोधन | ०२ | ५८११ | २८४७ | २९६४ |
| | | प्रकल्प | ०१ | - | - | - |
| ५. | पुस्तक प्रकाशन | | ०३ | - | - | - |
| ६. | आय.आय.डी.एल. | एकूण व्याख्याने | ३४२ | - | - | - |
| | | प्रात्यक्षिक सत्रे | ६५ | - | - | - |
| | | एकूण विशेष मार्गदर्शक | २०३ | - | - | - |
| | | क्षेत्र भेटी व अन्य | ४ | - | - | - |
| | **एकूण** | | **७१२** | **१४,९००** | **४११६** | **५६४२** |

प्रबोधिनी प्रवर्तित अटल प्रतिभा पोषण केंद्र

| कार्यक्रम | सहभागी | महिला | पुरुष |
|---|---|---|---|
| १० | ३१७ | ७० | २४७ |

# १. विशेष कार्यक्रम :

**१.१** संवेदना अभियान ऑक्टोबर २०२० मध्ये महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. त्याचा फटका राज्याला मोठ्या प्रमाणात बसला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. यात विशेषतः शेतीचे मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून प्रबोधिनीच्या वतीने 'संवेदना अभियान' योजण्यात आले. या अभियानाअंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यात आली आणि या कुटुंबांची दिवाळी आनंदाने साजरी व्हावी असाही प्रयत्न केला गेला .

त्यासाठी प्रबोधिनीने समाजातील दानशूर आणि हितचिंतकांना आर्थिक मदतीचे आवाहन केले होते. एका कुटुंबाला आवश्यक जीवनावश्यक साहित्य पुरविता यावे म्हणून प्रत्येकी रुपये २०००/- अर्थसाह्य करावे, अशी कल्पना होती. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अतिवृष्टीची सर्वाधिक झळ उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्यास पोचली होती. त्यामुळे या तालुक्यातील २४ गावांची निवड करण्यात आली.

परांडा तालुक्यातील देवगाव येथे दि. १३ नोव्हेंबर २०२० रोजी संवेदना अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी उस्मानाबाद जिल्ह्यातील ॲड. मिलिंद पाटील, शेषाद्री डांगे, विकास कुलकर्णी, कल्याण सागर बँकेचे उपाध्यक्ष राजेंद्र चौधरी, पत्रकार आनंद खर्डेकर, नागनाथ नरसाळे आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी कोरडा शिधा, फराळ आणि पोशाख यांचा समावेश असलेली संवेदना पॅकेट्स तयार केली होती. या अभियानात २४ गावातील १९० शेतकरी बांधवांना लाभ झाला.



# २. प्रशिक्षण :

## अहवाल वर्षात प्रशिक्षणातील विशेष कार्यक्रम पुढीलप्रमाणे:

## २.१ महाराष्ट्राच्या राजकारणाची तोंडओळख:

मे २०२० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला ६० वर्षे पूर्ण झाली. याच पार्श्वभूमीवर प्रबोधिनीने महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांच्या वाटचालीवर व सामाजिक चळवळींवर प्रकाश टाकणारा एक आभासी दि. १८ - २२ मे २०२० रोजी वर्ग योजला होता. या वर्गात एकूण ५२ प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

वर्गाचे उद्घाटन प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या उपस्थितीत झाले. उद्घाटनप्रसंगी 'राज्यातील भौगोलिक विभाजनाची माहिती आणि महाराष्ट्राचा राजकीय विकास' या विषयावर सहभागींना त्यांनी मार्गदर्शन केले.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, कामगार चळवळ, दलित चळवळ, सहकार चळवळ आणि राजकारण तसेच काँग्रेस, शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस या महाराष्ट्रातील चार प्रमुख राजकीय पक्षांचा उदय, त्यांचा विकास , महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीय समीकरणे अशा विविध विषयांचा या वर्गात समावेश होता.

अरविंद कुळकर्णी, दिलीप चावरे, रवींद्र गोळे, मृणालिनी नानिवडेकर, धवल कुलकर्णी, प्रा.अविनाश कोल्हे, डॉ. प्रकाश पवार, माजी खासदार एम.के.अण्णा पाटील तसेच विधान भवनातील ग्रंथपाल बाबा वाघमारे यांनी विषयांची मांडणी केली. भूतपूर्व सनदी अधिकारी व लेखक अविनाश धर्माधिकारी यांनी वर्गाचा समारोप केला.

## २.२ भारतातील पक्षीय राजकारणावरील मूलभूत अभ्यासक्रम :

राजकीय पक्षांचा अभ्यास केल्याशिवाय भारतीय राजकारणाचा अभ्यास करणे अपूर्ण ठरते. राजकारणातील परिवर्तनात राजकीय पक्ष महत्त्वाची भूमिका बजावतात. या पक्षीय राजकारणावरील मूलभूत अभ्यासक्रमाच्या माध्यमातून, सहभागींना भारतीय राजकारणातील तीन प्रमुख राष्ट्रीय पक्षांच्या विचारसरणीचा इतिहास आणि विकास तसेच भारताच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण मध्य आणि ईशान्य भागांतील प्रत्येकी एका प्रांतीय पक्षाची तोंडओळख करून देण्यात आली.

दि. ८ ते १२ जून २०२० या कालावधीत झालेल्या अभ्यासवर्गाचे उद्घाटन उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष हृदय नारायण दीक्षित यांनी केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पार्टी (भारतीय जनसंघ), भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि माकपा, प्रादेशिक पक्षांमध्ये बिहारचे आर.जे.डी.-जे.डी.यू. आणि उत्तर प्रदेशचे सपा- बसपा, द्रविड पक्ष (द्रमुक-ए.आय.ए.डी.एम.के.), शिवसेना, अकाली दल आणि आसाम गणतंत्र परिषद इत्यादी विषयांवर अंगुला राकेश रेड्डी (प्रवक्ता भाजपा-तेलंगणा), डॉ. अनिर्बन गांगुली (संचालक, श्यामाप्रसाद मुखर्जी रिसर्च फाउंडेशन), अरविंद कुळकर्णी (ज्येष्ठ पत्रकार), अशोक टंडन, बैजयन्त पंडा (माजी खासदार), डॉ. गुरु प्रकाश (पाटणा विद्यापीठाचे सह-प्राध्यापक), जय मृग (सेफोलॉजिस्ट), समुद्रगुप्त कश्यप (ज्येष्ठ पत्रकार), शेषाद्री चारी (ऑर्गनायझर, माजी संपादक), स्वपन दास गुप्ता, ॲड. एस.जी. सूर्या (लेखक आणि तमिळनाडूचे युवा नेते), तरुण चुघ (भाजपाचे राष्ट्रीय सचिव) इत्यादी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. भाजपाचे तत्कालीन राष्ट्रीय सह - संघटन मंत्री व्ही. सतीश यांच्या मार्गदर्शनाने या अभ्यासक्रमाचा समारोप झाला. या अभ्यासक्रमाचा ८ राज्यांतून ५२ प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

## २.३ समुपदेशन परिचय अभ्यासक्रम :

गेल्या वर्षी कोविड-१९ संसर्ग व अपरिहार्य टाळेबंदी याचा परिणाम सामान्यांच्या जीवनावर झाला. या सर्व घडामोडीत लोकांच्या मानसिक आरोग्यावरील परिणाम दृष्य स्वरुपात समोर येऊ लागले. या पार्श्वभूमीवर प्रबोधिनीने दि. १८ - २३ जुलै २०२० व दि. ४ - १० सप्टेंबर २०२० या कालावधीत दोन 'समुपदेशन परिचय अभ्यासक्रम' आयोजित केले होते. दोन्ही अभ्यासक्रमासाठी गोवा, राजस्थान महाराष्ट्रासह राज्यातील ३८ महिला आणि ३३ पुरुष अशा एकूण ७१ प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

या अभ्यासक्रमामध्ये एकूण १६ विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. मानसशास्त्राची तोंडओळख व मानसशास्त्रीय समस्या, समुपदेशन व्यवसायाची ओळख, विविध क्षेत्रातील समुपदेशन, समुपदेशन प्रक्रिया, सिध्दांत, उपचार पध्दती, तसेच समुपदेशन तंत्रे व कौशल्ये आणि समुपदेशनामधील नीतीमूल्ये अशा विविध विषयांवर डॉ. स्वाती अमराळे-जाधव, क्षमा कौशिक, डॉ. संदीप जगदाळे आणि डॉ. प्रशांत भोसले यांनी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणाबरोबरच आत्मिक ज्ञान, धोरण व जबाबदारीने प्रक्रिया राबवणा-या समुपदेशकाचे निखळ व खरे प्रयत्न आपल्या हिताचे ठरतात यात संदेह नाही, असे विचार डॉ. मीना शिलेदार यांनी या अभ्यासक्रमाच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले.

## २.४ लोकमान्य टिळक : जीवन आणि कार्य

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त 'लोकमान्य टिळक: जीवन आणि कार्य' हा आभासी वर्ग दि. १ ते ४ ऑगस्ट २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षण वर्गात प्रदेशासाहित ही दोन राज्ये आणि १४ जिल्ह्यातील ५८ महिला व पुरूष प्रतिनिधी सहभागी झाले होते.

ज्येष्ठ लेखक, डॉ. सदानंद मोरे यांच्या उपस्थितीत या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन झाले. प्रबोधिनीचे महासंचालक आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे सचिव रवींद्र साठे यांनी अभ्यासक्रमामागची भूमिका सर्वांसमोर मांडली. सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विनोद पवार आणि डॉ. अशोकराव मोडक यावेळी उपस्थित होते.

या प्रशिक्षण वर्गात लोकमान्यांचे भारतीय राजकारणातील योगदान, लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक, लोकमान्यांचे गीतारहस्य, टिळकांचे प्राच्यविद्या संशोधन, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक आणि स्वा. सावरकर, लोकमान्य टिळकांचे अर्थकारण, लोकमान्यांच्या आठवणी, कायदे पंडित लोकमान्य टिळक व टिळकांनी योजलेले सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम अशा एकूण नऊ विषयांची अरविंद कुळकर्णी, प्रा. अविनाश कोल्हे, डॉ. मुकुंद दातार, डॉ. प्रमोद पाठक, डॉ. अशोक मोडक, चंद्रशेखर टिळक, पार्थ बावस्कर आणि विकास परांजपे यांनी मांडणी केली.

समारोप सत्रात सहभागींनी आपले अभिप्राय व्यक्त केले. डॉ. अशोक मोडक तसेच सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे अध्यक्ष, भिकुजी (दादा) इदाते यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले.

## २.५ #Tweet4Bharat - भारतातील पहिली ट्विटर थ्रेड (सूत्र) स्पर्धा :

लोकमान्य टिळकांच्या शंभराव्या पुण्यतिथीनिमित्त आयआयडीएलने भारतातील पहिली ट्विटर-थ्रेड (सूत्र) स्पर्धा १ ते १२ ऑगस्ट २०२० या कालावधीत आयोजित केली होती.

मराठी, हिंदी आणि इंग्लिश अशा तीन भाषांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी राष्ट्रीय एकात्मता, महिला सशक्तीकरण आणि सामाजिक न्याय हे विषय देण्यात आले होते.

या स्पर्धेत एकूण ३३७ थ्रेड्सनी भाग घेतला, त्यापैकी २७ विजेत्यांना डाबर या प्रायोजकांकडून रोख रक्कम व ट्विटर इंडिया कडून आकर्षक बक्षिसे देण्यात आले.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला, १४ ऑगस्टच्या मध्यरात्री आयोजित केलेल्या कार्यक्रमात सर्व २७ विजेत्यांना डॉ. विनय सहस्रबुद्धे, भाजपा प्रवक्ते डॉ. सुधांशु त्रिवेदी यांच्या प्रमुख उपस्थितीत बोलण्याची संधी मिळाली.

स्पर्धेदरम्यान दोन प्रशिक्षण कार्यक्रमही घेण्यात आले. यातील एक कार्यक्रम ट्विटरवर थेट (लाइव्ह) घेण्यात आला आणि मल्हार पांडे यांनी त्याचे सूत्रसंचालन केले, तर दुसरे प्रशिक्षण ट्विटर इंडियाच्या सहकार्याने आयोजित केले गेले आणि पायल कामथ यांनी सहभागींना संबोधित केले.

आदित्यराज कौल, आनंद रंगनाथन, ॲड. मोनिका अरोरा, दिनेश गुणे, करुणा गोपाळ, प्रफुल्ल केतकर, शंतनु गुप्ता, शेफाली वैद्य आणि रवींद्र साठे यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून भूमिका बजावली.

आयोजन समितीमध्ये आशुतोष मुगलीकर, चारू प्रज्ञा, धवल पटेल, मल्हार पांडे, ओंकार थोटे, पूनम दमानी, सिद्धार्थ कुलकर्णी आणि देवेंद्र पै यांचा समावेश होता.

या कार्यक्रमासाठी, ऑफ इंडिया (इंग्लिश आणि हिंदी) आणि महा एमटीबी ही प्रसारमाध्यमे भागीदार होते.

## २.६ महिला नेतृत्व प्रशिक्षण :

या आभासी कार्यशाळेचे उद्घाटन  दि. २८ सप्टेंबर २०२० रोजी प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी केले.

महिलांमधील नेतृत्वगुण विकसित करून एक सकारात्मक बदल घडवून आणणे हा या कार्यशाळेचा मुख्य हेतू होता. या विषयाच्या अनुषंगाने या कार्यशाळेत देशातील आणि परदेशातील ५० महिला प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. डॉ. स्वप्ना पाटकर आणि डॉ.जी.सी.कविथा यांनी विषयाची मांडणी केली.

## प्रशिक्षणातील विशेष कार्यक्रमांच्या वृत्ताव्यतिरिक्त अन्य झालेल्या प्रशिक्षणाची सूची

| क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | संख्या | | | मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | एकूण | |
| १ | २०-२१ मे २०२० | स्वराभिनय शिबिर | १२ | १० | २२ | रवींद्र साठे, प्रमोद पवार |
| २ | २३ ते २७ मे २०२० | आमदारांच्या स्वीय साहाय्यकांसाठी प्रशिक्षण वर्ग | ३९ | - | ३९ | विजयराव पुराणिक, प्रवीण दरेकर माधव भांडारी, विशाखा कुलकर्णी, योगेश सागर, रणधीर सावरकर, देवेंद्र पै |
| ३ | ९ ते ११ जून २०२० | कार्यक्रम संयोजन प्रशिक्षण शिबिर | १४ | ६ | २२ | विद्याधर निमकर, आनंद क्षेमकल्याणी, मनीषा क्षेमकल्याणी |
| ४ | १६ ते १८ जून २०२० | भाषणकला आणि संवाद कौशल्ये कार्यशाळा | १८ | १८ | ३६ | डॉ. विनय सहस्रबुद्धे, रवींद्र साठे, प्रा. अविनाश कोल्हे, प्रमोद पवार, मंदार भारदे, प्रिया सावंत |
| ५ | २२ ते २६ जून २०२० | आमदारांच्या स्वीय साहाय्यकांसाठी प्रशिक्षण वर्ग | २७ | - | २७ | गोपाळ शेट्टी, अतुल भातखळकर, माधव भांडारी, विशाखा कुलकर्णी, योगेश सागर, डॉ. संजय कुटे, देवेंद्र पै |
| ६ | २९ जून ते ३ जुलै २०२० | 'बदलत्या परिस्थितीत संस्थांसमोरील आव्हाने आणि उपाय' | १८ | १२ | ३० | पोपटराव पवार, श्रीराम पटवर्धन, विवेक अत्रे, डॉ. प्रसाद देवधर, डॉ. अनंत पंढरे, नीलेश निमकर, चंद्रिका चौहान, धनंजय गोळम, डॉ. गिरीश कुलकर्णी |
| ७ | ६ ते ९ जुलै २०२० | हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम | ५१ | ५ | ५६ | सुमंत आमशेकर, प्रा. अनिरुद्ध देशपांडे, मृदुला देवस्थळी, पार्थ बावस्कर, अरविंद कुळकर्णी, भाऊ तोरसेकर, विराग पाचपोर, ॲड. किशोर जावळे, प्रमोद बापट, रवींद्र गोळे, प्रा. अविनाश कोल्हे |

| क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | संख्या | | | मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | एकूण | |
| ८ | १६-१७-१८ ऑगस्ट २०२० | लोककल्याणकारी योजना आणि लोकप्रतिनिधींच्या स्वीय साहाय्यकांची भूमिका : कार्यशाळा | २८ | - | २८ | चंद्रकांत (दादा) पाटील, केशव उपाध्ये, माधव भांडारी, विनायक आंबेकर, डॉ. अनिल बोंडे, प्रदीप पेशकार, चित्रा वाघ, श्रीराम सावरीकर, विवेक अत्रे |
| ९ | २२-२३ सप्टेंबर २०२० | कोविड-१९ आणि स्वैच्छिक संस्था प्रशिक्षण वर्ग | | | | विवेक अत्रे, श्रीराम पटवर्धन |
| १० | २६-२७ सप्टेंबर २०२० | सामाजिक संस्थांसाठी आर्थिक कायदे प्रशिक्षण शिबिर | २३ | १२ | ३५ | रवींद्र साठे, विवेक अत्रे, श्रीराम पटवर्धन, शैलेश निपुणगे |
| ११ | ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर २०२० | वक्तृत्वकला आणि संवाद कौशल्ये प्रशिक्षण शिबिर | १४ | ९ | २३ | दीपक करंजीकर, भानू काळे, डॉ. सोनाली लोहार, प्रिया सावंत, स्वाती पाटणकर, मंदार भारदे |
| १२ | २८-२९ नोव्हेंबर २०२० | स्वयंसेवी संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी कार्यालय व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर | २३ | ९ | ३२ | डॉ. अरुणा कौलगुड, प्रिया सावंत, अनिल पाटील, श्रीराम पटवर्धन, अमेया जाधव, देवेंद्र पै |
| १३ | ९-१० जानेवारी २०२१ | राजकीय कार्यकर्त्यांसाठी भाषणकला प्रशिक्षण शिबिर (चंचल कार्यालय) | १९ | ३ | २२ | अवधूत वाघ, माधव भांडारी, डॉ स्वप्ना पाटकर, प्रमोद पवार, श्रीकांत भारतीय, मंदार भारदे |
| १४ | २३-२४ जानेवारी २०२१ | वक्तृत्वकला आणि संवाद कौशल्ये प्रशिक्षण शिबिर (निवासी) | - | - | २२ | अंबरीश मिश्र, प्रा. केशव परांजपे, प्रमोद पवार, आनंद क्षेमकल्याणी, मनीषा क्षेमकल्याणी, विश्वाधार देशमुख |

# ३. प्रबोधन:

## ३.१ 'आत्मनिर्भर भारताची संकल्पना':

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोनाच्या काळामध्ये भारत आत्मनिर्भर बनविण्यासाठी देशवासीयांना आवाहन केले होते. भारताच्या आर्थिक क्षेत्रामध्ये एक मोठी क्रांती आणणारी ही घटना होती. यानंतर देशभर या विषयावर मोठी चर्चा सुरु झाली. अनेकांनी या संकल्पनेचे स्वागतही केले. काही गैरसमजही जनतेत दिसून येत होते. या पार्श्वभूमीवर 'आत्मनिर्भर भारत' ही नेमकी संकल्पना काय आहे आणि आत्मनिर्भर भारताची गरज का निर्माण झाली हे समजून घेण्यासाठी 'आत्मनिर्भर भारताची संकल्पना' या विषयावर आंतरराष्ट्रीय संबंध आणि परराष्ट्र धोरण विषयाचे विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे आभासी व्याख्यान शनिवार, दि. ५ डिसेंबर २०२० रोजी आयोजित केले होते.

आत्मनिर्भर भारत म्हणजे भारत आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे पूर्णपणे पाठ फिरवेल, स्वत:ला जगापासून विलग करेल. आर्थिक उदारीकरणानंतरच्या गेल्या ३० वर्षात केलेली प्रगती बाजूला सारत भारत आपल्या सीमा इतर देशांसाठी बंद करत आहे, असे गैरसमज पसरवले जात आहेत. यावर बोलताना डॉ. शैलेंद्र देवळाणकर म्हणतात, "वस्तुत: आत्मनिर्भर भारत याचा अर्थ लायसन्स परमिट राज असे नाही. त्याचा अर्थ स्थानिक उद्योगांना जागतिक दर्जाचे बनवून त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धाक्षम बनविणे असा आहे. यासाठी त्यांना मजबूत बळकटी देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोरोनाच्या काळात व्यवसाय ठप्प पडू न देता देशांतर्गत स्थानिक पातळीवर त्याचे उत्पादन सुरू करणे आवश्यक आहे."

"आत्मनिर्भरतेची कास धरणे, अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट आणि आत्मनिर्भरता, गरिबी निर्मूलनासाठीही आत्मनिर्भरतेची गरज, धोरणात्मक बदलांची गरज आणि आत्मनिर्भरतेसाठीची प्रमुख क्षेत्रे अशा सर्व विषयांवर मांडणी करत आत्मनिर्भरतेच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक सुधारणा भारताला घडवून आणायच्या आहेत. भारत आता इतरांच्या नियमांचे पालन करणारा देश राहिला नसून नियम बनविणारा देश बनत आहे", असेही डॉ.देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

आता नोक-या मागणारे नाही तर नोक-या देणारे व्हा! स्वत:ची ताकद काय आहे, मर्यादा काय आहे , आपली बलस्थाने कोणती आणि दुर्बलता कोणती हे ओळखून कामाला लागा, आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न करा, असा संदेश पंतप्रधानांनी दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

## ३.२ गुरुवार सभा :

प्रबोधिनीच्या वतीने गेली २२ वर्षे गुरुवार सभा हा उपक्रम नियमितपणे सुरु आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी प्रबोधिनीच्या वडाळा, मुंबई येथील चंचल कार्यालयात होणाऱ्या या उपक्रमात महत्त्वाच्या राष्ट्रीय, राजकीय व सामाजिक विषयांवर अभ्यासकांचे व तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात येते. अहवाल वर्षात कोरानाचे संकट आल्यामुळे गुरुवार सभा आभासी स्वरूपात आयोजित करण्यात आल्या.

## अहवाल वर्षात झालेल्या गुरुवार सभेचा तपशील खालीलप्रमाणे

| क्र. | दिनांक | विषय | उपस्थिती | वक्ता |
|---|---|---|---|---|
| १. | १५ ऑक्टोबर २०२० | कृषी सुधारणा विधेयक: समज-गैरसमज (चर्चासत्र) | ६५ | गोविंद जोशी |
| २. | १२ नोव्हेंबर २०२० | 'द क्वॉड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग' (क्वॉड) | ३५ | डॉ. शैलेंद्र देवळाणकर |
| ३. | २४ डिसेंबर २०२० | लव्ह जिहाद : एक भयानक वास्तव | ६५ | मोहन सालेकर |
| ४. | ११ फेब्रुवारी २०२१ | अर्थ संकल्प : अर्थ अनेक (२०२०-२०२१) | ५० | चंद्रशेखर टिळक |
| ५. | १८ मार्च २०२१ | म्यानमारमध्ये पुन्हा लष्करशाही | ५८ | प्रा. अविनाश कोल्हे |

### ३.३ प्रबोधनात्मक अन्य कार्यक्रम :

| क्र. | दिनांक | विषय | वक्ता |
|---|---|---|---|
| १ | ११ जून २०२० | India China Border Tension | नितीन गोखले |
| २ | १६ जून २०२० | चीन का लद्दाख मे अतिक्रमण और मिलिटरी चॅलेंज वर्तमान स्थिती | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ३ | २७ जून २०२० | भारत -चीन व्यापार युध्द: वर्तमान स्थिती एवं भविष्य की दिशा | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ४ | ४ जुलै २०२० | चीन का लद्दाख मे अतिक्रमण और भारतीय सैन्य का प्रत्युत्तर | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ५ | ११ जुलै २०२० | चीन का भारत के विरुद्ध अपप्रचार युद्ध, दुष्प्रचार युद्ध, मानसिक युद्ध और उसे भारत का प्रत्युत्तर | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ६ | २५ जुलै २०२० | Kargil war operation - vijaya saga of blood guts and glory पार्ट १ | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ७ | १८ जुलै २०२० | चीन की कमजोरिया : तिब्बत, शिनजियांग और हॉगकॉंग इस का फायदा कैसे उठाये | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ८ | १ ऑगस्ट २०२० | Kargil War Operation - Vijay a saga of blood guts and glory पार्ट २ | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ९ | ८ ऑगस्ट २०२० | Important event affecting National Security of the week 1-8 August | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| १० | १५ ऑगस्ट २०२० | Review of Internal and external security challenge on the eve of 15 Aug 2020 | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| ११ | ३ सप्टेंबर २०२० | Indian army's Proactive Operation in South Pengongso so Lake Role of SF Commando Force | ब्रिगेडियर हेमंत महाजन |
| १२ | १२ सप्टेंबर २०२० | China Concentrates 50000 Troops on Laddakh border, how will India Counter it | ब्रिगेडियर हेमंत महाजन |

*गेल्या वर्षी लडाखमध्ये भारत - चीन दरम्यान युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. सुरक्षा विषयाचे अभ्यासक पत्रकार नितीन गोखले यांचे ११ जून रोजी व्याख्यान योजण्यात आले, त्यानंतर हाच विषय घेऊन भारतीय सैन्यदलातील माजी अधिकारी व संरक्षण विषयाचे अभ्यासक ब्रिगेडियर हेमंत महाजन यांची आभासी पद्धतीत व्याख्याने योजण्यात आली. जून ते सप्टेंबर या कालावधीत ब्रिगेडियर महाजन यांनी ११ व्याख्याने दिली.

# ४. संशोधन व सरकारी प्रकल्प :

## ४.१ 'रुपे' प्रभाव आकलन अभ्यास:

रूपे कार्डच्या उपयुक्ततेचा अभ्यास करण्यासाठी प्रबोधिनीने बिहारमधील २६४२ कार्डधारक आणि उत्तर प्रदेशातील २५०० कार्डधारकांचे  सर्वेक्षण केले. नाबार्डने आर्थिक व्यवहारासाठी सुरू केलेल्या रूपे कार्डची नेमकी उपयुक्तता समजून घेण्यासाठी हे सर्वेक्षण केले गेले. सर्वेक्षणाचा अहवाल ऑगस्ट २०२० मध्ये नाबार्डला सादर करण्यात आला.

## ४.२ ठाणे जिल्ह्यातील कल्याण मधील आशा स्वयंसेविकांची क्षमता बांधणी :

भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांच्या सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व निधी) अंतर्गत आशा स्वयंसेविकांच्या क्षमता विकासासाठी प्रबोधिनीला निधी प्रदान केला. या योजनेंतर्गत, प्रबोधिनीने महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील कल्याण विद्युत क्षेत्रातील आशा स्वयंसेविकांसाठी क्षमता बांधणी उपक्रम योजले. जुलै २०२० मध्ये २, ३ आणि ४ या टप्प्यांचा अहवाल सुपूर्द केला. अंतिम अहवाल सप्टेंबर २०२० मध्ये सादर करण्यात आला.

## ४.३ पं. दीनदयाळ उपाध्याय वस्तु संग्रहालय :

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीला पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनावर आधारित वस्तु संग्रहालय उभारण्याकरता अर्थसाहाय्य निधी दिला आहे. या संग्रहालयात  पं. दीनदयाळ उपाध्याय यांची मूर्ती तसेच त्यांचे जीवन आणि कार्य याविषयी छायाचित्रे, चलचित्रे आणि इतर साहित्य अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून प्रदर्शित केले जाईल. २०१८ मध्ये संग्रहालयाचा पाया घातला गेला, तेव्हापासून नियोजनानुसार गेले वर्षभर हे काम प्रगतीपथावर होते. २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस संग्रहालय पूर्णत्वास गेले.



## ५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासकेंद्र ग्रंथालय:

प्रबोधिनीचे हे ग्रंथालय शासनमान्य (महाराष्ट्र राज्य) असून या ग्रंथालयाचे पूर्ण संगणकीकरण करण्यात आले आहे. ग्रंथालयामध्ये विपुल ग्रंथसंपदा, विविध विषयांवरील पुस्तिका, विविध विषयांवरील वृत्तपत्रीय कात्रणे उपलब्ध आहेत. महाराष्ट्राबाहेरील अभ्यासक, वाचक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात. ग्रंथालयात मराठी, हिंदी आणि इंग्लिश भाषांतील ग्रंथांचा समावेश आहे.

ग्रंथालयाच्या वतीने सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी, कर्मचारीवृंद आणि शालेय ग्रंथपाल यांच्यासाठी विविध विषयांवरील प्रशिक्षण, कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

**ग्रंथालयातील साहित्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे:**

| अ. क्र. | ग्रंथालयीन साहित्य प्रकार | नोंद साहित्य |
|---|---|---|
| १ | ग्रंथ (मराठी, हिंदी व इंग्लिश) | १६७७६ |
| २ | पुस्तिका (विविध विषयांवरील संदर्भ पुस्तिका) | ३६५७ |
| ३ | दुर्मीळ वृत्तपत्रीय कात्रणे | ९७००० |
| ४ | ध्वनिफिती | ७१० |
| ५ | चित्रफिती | २२७ |
| ६ | सीडीज | ७५२ |
| ७ | दुर्मीळ वृत्तपत्रे | ६३ |
| ८ | नकाशे | १३ |
| ९ | जर्नल्स | १११० |

अहवाल वर्षात ग्रंथालयातर्फे १२ प्रबोधनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व महापरिनिर्वाण दिन, ग्रंथांचे जतन आणि संवर्धन, वाचन प्रेरणा दिन, माझी वाचन संस्कृती, मराठी भाषा गौरव दिन, प्रबोधनकार ठाकरे : व्यक्ती आणि कार्य, स्वा. सावरकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती व ग्रंथ प्रदर्शन इत्यादी उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमात रवींद्र गोळे, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, ओमकार कडू, भानू काळे, डॉ. विजया वाड, अरविंद कुळकर्णी आणि अरुण करमरकर यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली.

अनेक अत्याधुनिक सेवा-सुविधा असलेल्या या ग्रंथालयाला अनेक व्यक्तींनी ग्रंथभेटी दिल्या आहेत. यामध्ये प्रवीण दरेकर, दिलीप चावरे, माधव भांडारी, राममोहन हर्डीकर, मयंक गांधी, सारंग दर्शने, प्राची साठे, विद्या देवधर, श्रीकांत रांगणेकर यांचा समावेश आहे.

## ग्रंथालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा तपशील

| क्र. | दिनांक | विषय | उपस्थिती | वक्ता |
|---|---|---|---|---|
| १. | १७ सप्टेंबर २०२० | ग्रंथांचे जतन आणि संवर्धन | १७९ | ओमकार कडू |
| २. | १९ ऑक्टोबर २०२० | वाचन प्रेरणा दिन – माझी वाचन संस्कृती | १२१ | ज्येष्ठ साहित्यिक भानू काळे |
| ३. | ६ डिसेंबर २०२० | डॉ. आंबेडकर, संविधान आणि समरसता | ६० | ज्येष्ठ पत्रकार रवींद्र गोळे |
| ४. | ११ जानेवारी २०२१ | प्रबोधनकार ठाकरे : व्यक्ती आणि कार्य | ३५ | ज्येष्ठ पत्रकार अरविंद कुळकर्णी |
| ५. | २७ जानेवारी २०२१ | मराठी भाषेचे सौंदर्य | ८२ | ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर |
| ६. | २ मार्च २०२१ | माझी मराठी मराठी | ११५ | ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विजया वाड |

## ६. पुस्तक प्रकाशन व अन्य:

**६.१ सांस्कृतिक राष्ट्रवादाचे शिल्पकार:** भाजपाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि विद्यमान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आर्य चाणक्य, बंकिमचंद्र चटोपाध्याय, वीर सावरकर, डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पं. दीनदयाळ उपाध्याय यांसारख्या महान व्यक्तींवर देशभर भाषणे केली. या भाषणांद्वारे शहा यांनी या सर्व महान व्यक्तींनी शिकवलेल्या सांस्कृतिक राष्ट्रवादावर प्रकाश टाकला. या भाषणांचा काही भाग प्रबोधिनीने पुस्तकरूपात संकलित आणि संपादित केला. या पुस्तकाची हिंदी आवृत्ती २०१९ मध्ये केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी प्रकाशित केली होती. पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती नोव्हेंबर २०२० मध्ये प्रकाशित झाली.

**६.२ प्रबोधिनी पत्रिका:** रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी समकालीन महत्त्वाच्या विषयांवर राष्ट्रीय परिषद आयोजित करते. गेल्या काही वर्षात स्टार्ट अप इंडिया, व्यावसायिक संस्थांचे सामाजिक उत्तरदायित्व (सी.एस.आर.) आदि विषयांवर परिषदा झाल्या. या परिषदांमध्ये सहभागी होणारे वक्ते व तज्ज्ञ व्यक्ती संबंधित विषयांची मांडणी करतात, यावर आधारित प्रबोधिनी एक पत्रिका प्रकाशित करते. ही पत्रिका ‘प्रबोधिनी पत्रिका’ नावाने ओळखली जाते. अहवाल वर्षात या पत्रिकेस आर.एन्. आय. मिळाला, ही उल्लेखनीय बाब आहे.

**६.३ इंडियन जर्नल ऑफ डेमोक्रॅटिक गव्हर्नन्स (आय.जे.डी.जी):**
म्हाळगी प्रबोधिनीने या अहवाल वर्षात आय.जे. डी. जी. या नावाने एक मासिक सुरू केले आहे. यांस भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषदेकडून (आय.सी.एस्.एस्. आर) आर्थिक सहकार्य मिळाले आहे.

हे द्वैवार्षिक शैक्षणिक व वैचारिक मासिक असून यांत लोकशाही व सुशासन या विषयांवर मुख्यत्वे भर आहे. या विषयांच्या अनुषंगाने प्रादेशिक ते राष्ट्रीय विकासासाठी हाती घेण्यात येणारे नावीन्यपूर्ण उपक्रम व नीती निर्धारण यासंदर्भात तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तीचे विचार प्रदर्शित करणारे लेख प्रकशित केले जातात.

अहवाल वर्षात एकल वापर प्लास्टिकचे निर्मूलन (सिंगल यूज्ड प्लास्टिक) या विषयावर प्रथम अंक प्रकाशित झाला याही मासिकास आय.सी.एस.एस.आर. चे सहकार्य लाभले असून या मासिकासही आय.एस. एस.एन. आणि आर.एन. आय. ची मान्यता मिळाली आहे.

## ७. संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या पुण्यातील संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे समाजातील विविध स्तरातील, क्षेत्रातील आणि व्यवसायातील घटकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित करण्यात येतात. गेल्या एक तपाहून अधिक काळ हे केंद्र पुण्यात कार्यरत असून तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींच्या सहाय्याने शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि इतर विविध क्षेत्रातील मनुष्यबळ विकासासाठी येथे प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. व्यक्तिगत क्षमता संवर्धन, त्यासाठी प्रशिक्षण, त्यातून कार्यक्षमता वृद्धी व नेतृत्व विकास आणि त्याद्वारे संस्थात्मक विकासाला हातभार अशी चतुःसूत्री आधारभूत मानून प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या स्वाती महाळंक या केंद्राच्या कार्यकारी प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळत आहेत.

नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात एकूण २२ कार्यक्रम झाले. यामध्येही नवनवीन विषय हाताळण्याची आपली खासियत केंद्राने कायम राखली. कोविड – १९ आपत्तीमुळे करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर हे प्रशिक्षण कार्यक्रम दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातूनच झाले. अनेक विषय ऑनलाइन पद्धतीने हाताळताना काही मर्यादा येतात. पण आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्यावर काही अंशी तरी मात करता येईल का, याचा प्रयत्न कार्यशाळांमध्ये करण्यात आला. त्यातूनच डबिंग – रेकॉर्डिंग स्टुडीओची व्हर्चुअल टूर सहभागींना करायला मिळाली.

**या केंद्रातर्फे अहवाल वर्षात आयोजित केलेल्या काही विशेष कार्यक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे :**

### ७.१ शिक्षक क्षमता विकास कार्यक्रम – ऑनलाइन अध्यापन तंत्र:

आभासी पद्धतीने अध्यापन कसे करावे हे शिकविणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमात यासाठी उपयुक्त ॲप्लिकेशन्स माहीत करून घेणे, त्याद्वारे मीटिंग ठरविणे, क्लासरूम तयार करणे, विद्यार्थ्यांना नोट्स आणि असाईनमेंट्स देणे, आभासी लेक्चर्स घेणे, त्याच माध्यमातून त्याच वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधणे इत्यादी घटकांचा समावेश होता. यामुळे आभासी अध्यापनाचे नवे तंत्र शास्त्रशुद्ध पद्धतीने आत्मसात करणे शिक्षकांना शक्य झाले. या प्रशिक्षण कार्यशाळांच्या माध्यमातून शिक्षणक्षेत्रासाठी आवश्यक नवे बदलते तंत्रज्ञान समजून घेत ते वापरू शकणारे 'डिजिटल वॉरियर्स' तयार करण्यास प्रबोधिनीने हातभार लावला.

सन २०२०-२०२१ या अहवाल वर्षात या विषयावरील कार्यशाळेचे एकूण १० वर्ग पुणे केंद्रातर्फे घेण्यात आले.

### ७.२ मिरज शिक्षण संस्था, मिरज (प्राथमिक शिक्षकांसाठी) :

नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे मिरज शिक्षण संस्थेच्या ८ प्राथमिक शाळांमधील अध्यापकांसाठी दि. १३ ते १५ मे २०२० या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत आभासी अध्यापन तंत्र कार्यशाळेचे आयोजन दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आले होते. संस्थेतील ६३ अध्यापक त्यामध्ये सहभागी झाले होते. मिरज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शैलेश देशपांडे आणि केंद्राच्या कार्यकारी प्रमुख स्वाती महाळंक यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. अभियांत्रिकी शाखेतील तज्ज्ञ योगेश शेटे यांनी सहभागींना मार्गदर्शन केले. प्राथमिक शिक्षण घेणारे विद्यार्थी या नव्या माध्यमाशी समरस व्हावेत, त्यांचे लक्ष अध्यापनात गुंतून राहावे यासाठी काय करावे, याचे समर्पक मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. "विद्यार्थ्यांना आभासी पध्दतीने कसे शिकवायचे या गोष्टीचा खूप ताण आला होता. पण हे प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रत्यक्ष शिकविण्याइतक्याच रंजक पद्धतीने मुलांना शिकविता येईल याचा विश्वास वाटतो आहे," अशी प्रतिक्रिया सहभागी अध्यापिका प्रज्ञा कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

### ७.३ अनंतराव थोपटे कला, वाणिज्य महाविद्यालय - ता. भोर, जि. पुणे :

राजगड ज्ञानपीठ संस्थेच्या अनंतराव थोपटे कला वाणिज्य महाविद्यालयासह अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय येथील ७४ प्राध्यापक या कार्यशाळेमध्ये सहभागी झाले होते. दि. ३०-३१ जून आणि १ जुलै २०२० या कालावधीमध्ये ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. संस्थेच्या सचिव डॉ. भाग्यश्री पाटील, प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे, कार्यकारी प्रमुख स्वाती महाळंक यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. या अत्यावश्यक विषयावरील प्रशिक्षण आयोजित केल्याबद्दल डॉ. भाग्यश्री पाटील यांनी प्रबोधिनीचे आभार मानले. "या प्रशिक्षणामुळे नवे तंत्रज्ञान माहीत झाले आणि त्यातील नव्या संधीही माहीत झाल्या. त्याचा उपयोग आता विद्यार्थ्यांना शिकविताना नवनव्या गोष्टी करून पाहण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगले ज्ञान देण्यासाठी करता येईल," अशी प्रतिक्रिया अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसन्नकुमार देशमुख यांनी कार्यशाळेच्या समारोप सत्रामध्ये व्यक्त केली.

### ७.४ कौशल्य विकास कार्यक्रम :

गेल्या काही वर्षात केंद्र सरकारने कौशल्य विकास या पैलूवर विशेष भर दिला आहे. व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांबरोबरच कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम सुरु करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. युवावर्गामधील अंगभूत गुणकौशल्यांचा विकास करून त्याआधारे त्यांना स्वतःच्या पायावर लवकरात लवकर उभे राहण्यासाठी मदत करणे, स्वावलंबी करणे हे यामागचे मुख्य सूत्र आहे. त्यासाठी अनेक जणांच्या अंगी असलेल्या विविध गुणकौशल्यांच्या विकासासाठी मार्गदर्शन करणारे सहा प्रशिक्षण कार्यक्रम पुणे केंद्रातर्फे अहवाल वर्षात प्राधान्याने आयोजित करण्यात आले. त्या त्या क्षेत्रातील मान्यवर प्रतिभावंत कलाकारांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमांना अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### ७.५ अभिवाचन :

कोणतेही लिखित साहित्य वाचिक अभिनयाच्या माध्यमातून प्रभावीपणे सादर करण्याचे कौशल्य शिकविणारी अभिवाचन आभासी कार्यशाळा दि. १७ ते १९ जुलै २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्हे, तसेच दिल्ली, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश ही राज्य आणि अमेरिका इत्यादी ठिकाणांहून १०० कलावंत साहित्यप्रेमी सहभागी झाले होते. ज्येष्ठ अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे, कार्यकारी प्रमुख स्वाती महाळंक यावेळी उपस्थित होते.

राजकीय-सामाजिक क्षेत्रात काम करणारी प्रबोधिनी आता सांस्कृतिक साहित्यिक क्षेत्रातही तितक्याच हिरिरीने काम करीत असल्याबद्दल साठे यांनी यावेळी आनंद आणि समाधान व्यक्त केले. मृणाल कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष अभिवाचन करीत असताना गरजेचे असलेले बारकावे, आशय समजून घेण्याची प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले आणि प्रत्यक्ष अभिवाचनही करून दाखविले.

अभिवाचन म्हणजे काय, त्यासाठीची पूर्वतयारी, आवश्यक कौशल्ये, विविध आकृतिबंधांचे अभिवाचन, कौशल्य विकासासाठी काय करावे, अभिवाचनासाठी उपयुक्त संहिता इत्यादी विषयांवर ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर, दूरचित्रवाणी निवेदक दीपक वेलणकर, निवेदक स्वाती महाळंक, अभिनेत्री सीमा देशमुख, साहित्यिक डॉ. वीणा देव, अभिनेते - दिग्दर्शक योगेश देशपांडे आदींनी मार्गदर्शन केले. अखेरच्या दिवशी काही सहभागींना अभिवाचन करण्याची संधी देण्यात आली. त्यामध्ये पंधरा जणांनी अभिवाचन केले. अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी त्या अभिवाचनाचे परीक्षण केले आणि सहभागींना उपयुक्त सूचनाही केल्या.

"अनेक गोष्टी लोकांसमोर सादर करण्याची, अभिवाचन करण्याची आवड आहे, मात्र प्रत्यक्ष लोकांसमोर आणि माईकसमोर उभे राहिले की भीती वाटत असे. आता प्रभावीपणे अभिवाचन करायचे म्हणजे नेमके काय काय करायचे, हे या कार्यशाळेमुळे, सहभागी मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे समजले. त्यामुळे आता आत्मविश्वास वाढला आहे. यापुढे खऱ्या अर्थाने चांगले अभिवाचन करता येईल त्याचा विश्वास वाटतो," अशी प्रतिक्रिया सांगोल्याच्या संजीवनी केळकर यांनी व्यक्त केली.

### ७.६ स्वरसंस्कार ( व्हॉइस कल्चर ) :

प्रभावी व्यक्तिमत्त्वासाठी आवाजाचे असलेले महत्त्व लक्षात घेऊन स्वरसंस्कार अर्थात व्हॉइस कल्चर या विषयावरील कार्यशाळा दि. २८ ते ३० नोव्हेंबर २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. राज्याच्या विविध भागातील ४७ जण त्यामध्ये सहभागी झाले होते.

ज्येष्ठ रंगकर्मी आणि नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे निवृत्त संचालक प्रा. वामन केंद्रे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी महासंचालक रवींद्र साठे उपस्थित होते. आजच्या बोलणाऱ्यांच्या जगात आपल्या मताला किंमत येण्यासाठी प्रभावीपणे बोलता येणे आवश्यक आहे. मात्र आवाजाकडे जितके लक्ष दिले पाहिजे तेवढे दिले जात नाही, परिश्रम घेतले जात नाहीत. त्याविषयी अधिक माहिती व्हावी आणि सजगता निर्माण व्हावी यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले असल्याचे स्वाती महाळंक यांनी सांगितले. तर "त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी आणि त्या क्षेत्रात अधिक काही करू इच्छिणाऱ्या व्यक्ती यांना एका व्यासपीठावर आणल्यामुळे योग्य मार्गदर्शन मिळते आणि अनेक होतकरू व्यक्तींना आपल्यामधील गुणांची ओळख नव्याने होते. त्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरतात," असे साठे यांनी सांगितले. आपल्या उद्घाटनपर भाषणात प्रा. वामन केंद्रे यांनी ध्वनी आणि आवाज यातील फरक, आवाजाचे विविध प्रकार, पैलू, त्यांचा सुयोग्य वापर याविषयी सखोल मार्गदर्शन केले. आवाजाच्या क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ दीपक वेलणकर, राहुल सोलापूरकर, अभिनेत्री मुक्ता बर्वे, अभिनेते माधव अभ्यंकर, उदय सबनीस,

योगेश देशपांडे आदींनी मार्गदर्शन केले. आवाजाचा विविध प्रकारे वापर करून सादरीकरणही करून दाखविले. या कार्यशाळेमध्ये डबिंग रेकॉर्डिंग स्टुडिओची व्हर्च्युअल टूर हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. याद्वारे सहभागी मंडळींना पुण्यातील ओरायन स्टुडिओची सफर घडविण्यात आली. प्रत्यक्ष स्टुडिओ कसा असतो, विविध प्रकारच्या स्टुडिओची रचना कशी असते, त्यामधील यंत्रणा, उपकरणे, सामग्री काय काय असते, त्याचा कधी आणि कशासाठी वापर केला जातो इत्यादी बाबींची माहिती या उपक्रमाद्वारे सहभागी प्रतिनिधींना मिळाली. त्याचप्रमाणे या स्टुडिओमध्ये प्रत्यक्ष काम करण्याची, तेथील उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधीही या स्टुडिओतर्फे सहभागी प्रतिनिधींना देण्यात आली. त्यामुळे प्रशिक्षणार्थींचा उत्साह अधिकच दुणावला. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी आवाजाचा वेगवेगळ्या पद्धतींनी उपयोग करून सहभागी प्रतिनिधींनी सादरीकरण केले.

## ७.७ वेध - २०२०:

२०२० हे संपूर्ण वर्ष कोरोना संसर्गाच्या सावटाखाली गेल्यामुळे लोकांच्या मनावर असलेले भीतीचे मळभ, विविध क्षेत्रांमध्ये आलेली मरगळ आणि निराशा या पार्श्वभूमीवर २०२० या नव्या इंग्रजी वर्षाला सामोरे जाताना परिस्थिती काय असेल आणि आपण काय केले पाहिजे, याबाबत मार्गदर्शन करत मनामध्ये नवी प्रेरणा जागविण्याचा उद्देशाने 'वेध - २०२१' या अनोख्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. वर्षाच्या प्रारंभीच दि. ३ जानेवारी २०२१ रोजी ही कार्यशाळा मान्यवर मार्गदर्शक तज्ज्ञांच्या उपस्थितीत पार पडली. कार्यशाळेमध्ये ३५ जण सहभागी झाले होते.
कार्यशाळेचा प्रारंभही अभिनव पद्धतीने झाला. राष्ट्रीय कीर्तनकार आणि अभिनेते पंडित चारुदत्त आफळे यांनी सुरुवातीला 'कट्यार काळजात घुसली' या नाटकामधील पद सादर केले. 'या भवनातील गीत पुराणे, मवाळ हळवे सूर, जाऊ द्या आज येथुनी दूर...' या त्यांच्या बोलांनी जणू वातावरणामध्ये प्रसन्नतेचा शिडकावा केला. मराठी हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. "कोरोनाचा धोका अद्यापही पूर्णपणे टळलेला नसताना, निराश परिस्थितीतून पुढे जाण्यासाठी मार्ग शोधत असताना, मनामध्ये नवी ऊर्जा, नवा तजेला निर्माण होणे गरजेचे आहे. मनाचे व्यवस्थापन, मन आनंदी ठेवण्यासाठी आवश्यक असलेले प्रयत्न यांच्या माध्यमातून एक नवे चैतन्य प्राप्त करता यावे, नव्या वर्षाचे योग्य नियोजन करता यावे, म्हणून या कार्यशाळेचे आयोजन केले," असे स्वाती महाळंक यांनी यावेळी सांगितले.
अभिनेते सचिन यांनी आपले आनंदी मन आणि सुदृढ शरीर अशा चिरतारुण्याचे रहस्य विशद करताना सहभागींना युक्तीच्या चार गोष्टीही सांगितल्या. नैसर्गिक आयुष्य जगण्याला प्राधान्य दिले पाहिजे आणि जीवनाच्या प्रत्येक क्षणाचा उपभोग घेता आला पाहिजे, असा कानमंत्र त्यांनी यावेळी दिला.
ज्येष्ठ लेखक शिवराज गोर्ले यांनी 'आनंदी जीवनाचे सूत्र अर्थात आयुष्य - उत्सव जगण्याचा' या विषयावर मार्गदर्शन केले आणि सहभागी प्रतिनिधींना या चर्चेमध्ये सामावून घेत जगणं हा उत्सव कसा होतो, याविषयी मुक्तचिंतनही केले. कार्पोरेट क्षेत्रातील तज्ञ डॉ. दीपक परबत यांनी 'कोरोनानंतर उदयाला आलेले नवे उद्योग व्यवसाय आणि त्यातील संधी' याविषयी विचार व्यक्त केले आणि माहिती दिली. लेखक आणि कॉर्पोरेट प्रशिक्षक मनोज अंबिके यांनी यश नेमके कशाला म्हणावे, त्याची व्याख्या काय, त्याचे नेमके मापदंड कुठले आणि आपली वाटचाल कशी असली पाहिजे, याविषयी विचार मांडत असताना सहभागी प्रतिनिधींना विचारासाठी प्रवृत्त केले. कोरोना संक्रमणाच्या काळात घराघरातील अर्थकारण विस्कळीत झालेले असताना महिलांनी विविध मार्गांनी संसाराचा गाडा यशस्वीपणे सुरू ठेवल्याची अनेक उदाहरणे दृष्टीस आली होती. त्या अनुषंगाने महिलांचे बदलत्या काळातील एकूण समाज

व्यवस्थेमधील स्थान,भूमिका, जबाबदारी आणि त्यांचे अनुभव याविषयी माहिती देणारे आणि या विषयाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन प्रदान करणारे 'बाईपणाच्या परिघात वावरताना' हे सत्र सुवर्णा गोखले यांनी घेतले.

ज्येष्ठ मानसोपचार आणि मनोविकार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. "आस्था हे मानवी मूल्यांचे उगमस्थान आहे. आस्था आणि भावना असतील तर कोरोनाच्या महासंकटामधूनही आपण निश्चितपणे पार पडू," असा विश्वास त्यांनी आपल्या विषय विवेचनाद्वारे सहभागी मंडळींच्या मनात निर्माण केला. "या कार्यशाळेमुळे परिस्थितीकडे अधिक डोळसपणे पाहण्याची दृष्टी मिळाली आणि मनातील भीती नाहीशी होऊन खऱ्या अर्थाने नव्या उत्साहात नव्या वर्षाला प्रारंभ करावा, अशी इच्छा मनात निर्माण झाली," अशी प्रतिक्रिया वैभव पाटील यांनी व्यक्त केली.

### ७.८ भाषिक क्षमता विकास कार्यक्रम:

मातृभाषेला मानवी जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व असून मातृभाषेतून घेतलेले शिक्षण विद्यार्थ्याला अधिक परिपक्व करते, ही वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेली बाब आहे. त्यामुळे मराठी भाषा अधिक चांगल्या रीतीने वाचता, लिहिता आणि बोलता यावी, भाषा आणि विषय म्हणूनही त्याची विद्यार्थ्यांना गोडी लागावी, यादृष्टीने शिक्षकांना अधिक संपन्न करण्यासाठीचा प्रयत्न म्हणून मराठी भाषाविषयक दोन विशेष कार्यशाळा अहवाल वर्षात आयोजित करण्यात आल्या.

### ७.९ संपादन - शुद्धलेखन - मुद्रितशोधन :

साहित्य निर्मिती क्षेत्रामध्ये अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या तीन पैलूंवर अधिक प्रकाशझोत टाकत सखोल मार्गदर्शन करणारी ही विशेष आभासी कार्यशाळा दि. २०-२१ जानेवारी २०२१ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आली होती. राज्यातील विविध जिल्हे आणि गोवा परिसरातील शिक्षक, माध्यमलेखक, संपादक, आशयलेखक, ब्लॉगलेखक तसेच माध्यमकर्मी अशा विविध क्षेत्रातील ३५ जणांनी यामध्ये सहभाग घेतला.

राजहंस प्रकाशनचे संपादक डॉ. सदानंद बोरसे, प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे आणि कार्यकारी प्रमुख स्वाती महाळंक यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. एकूण साहित्यव्यवहारात जे लिहिले, बोलले आणि छापले जाते, ते बिनचूक, निर्दोष आणि सौंदर्यसंपन्न करण्यासाठी ही तीन भाषिक कौशल्ये महत्त्वाची असून त्यांचे महत्त्व अबाधित राहणार असल्याचे महाळंक यांनी स्पष्ट केले, तर ही कौशल्ये प्रारंभी फारशी महत्त्वाची वाटत नाहीत. मात्र आपण जे वाचकांना देतो ते निर्दोष आणि सर्वोत्तमच असले पाहिजे. त्यामधून संस्थेची प्रतिमा निर्माण होत असते. त्यामुळे यामध्ये जीव ओतला तर मराठी भाषेच्या एकूण विकासालाही त्याची मोठी मदत होणार आहे, असे प्रतिपादन साठे यांनी यावेळी केले.

डॉ. सदानंद बोरसे यांनी 'एकूण साहित्यव्यवहारात संपादन, शुद्धलेखन, मुद्रितशोधन या कौशल्यांचे महत्त्व आणि गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. इतर सत्रांमध्ये शुद्धलेखनाची गरज, महत्त्व आणि वर्तमान नियम, मुद्रितशोधन आणि संपादनाची गरज, त्यातील चिन्हे, संपादक - मुद्रितशोधकाचा व्यक्तिमत्त्व विकास, भूमिका आणि जबाबदारी, या क्षेत्रातील व्यावसायिक संधी इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. ज्येष्ठ व्याकरण तज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख, प्रा.अविनाश पंडित, गौरी देव आणि स्नेहा अवसरीकर यांनी मार्गदर्शन केले.

## एप्रिल २०२० ते मार्च २०२१
## याखेरीज इतर कार्यक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे

| अ. क्र | दिनांक | कार्यक्रमाचे नाव आणि संस्था | सहभागी संख्या |
|---|---|---|---|
| १. | २८ ते ३० मे २०२० | लॉकडाऊननंतरही चौपट व्यवसायवृद्धी | २२ |
| २. | १ ते ३ जून २०२० | ऑनलाइन अध्यापन तंत्र - बॅच क्र. १ - भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,ता. अंबेजोगाई, जि. बीड – प्राथमिक | ४६ |
| ३. | १ ते ३ जून २०२० | ऑनलाइन अध्यापन तंत्र बॅच बॅच क्र. २-भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, ता. अंबेजोगाई, जि. बीड- माध्यमिक | ४६ |
| ४. | ४ ते ६ जून २०२० | ऑनलाइन अध्यापन तंत्र बॅच बॅच क्र. ३-भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, ता. अंबेजोगाई, जि. बीड –प्राध्यापक | ४३ |
| ५. | ८ ते १० जून २०२० | ऑनलाइन अध्यापन तंत्र - रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, पुणे | ७५ |
| ६. | २७ ते २९ जून २०२० | मराठी अध्यापन कार्यशाळा | ३२ |
| ७. | ६ ते ८ जुलै २०२० | ऑनलाइन अध्यापन तंत्र - बॅच क्र. २ - राजगड ज्ञानपीठ- ता. भोर, जि. पुणे – प्राथमिक | ५७ |
| ८. | ९ ते ११ जुलै २०२० | ऑनलाइन अध्यापन तंत्र - बॅच क्र. ३ - राजगड ज्ञानपीठ- ता. भोर, जि. पुणे – माध्यमिक | ७० |
| ९. | ८ ऑगस्ट २०२० | स्मार्ट संपर्क आणि निधी उभारणी | ५७ |
| १०. | २८ ते ३० ऑगस्ट २०२० | ऑनलाइन अध्यापन तंत्र - रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, पुणे | २३ |
| ११. | ५ ते ६ सप्टेंबर २०२० | स्वयंसेवी संस्थांसाठी प्रसिद्धीसाहित्य निर्मिती कार्यशाळा | ६४ |
| १२. | २६ ते २९ ऑक्टोबर २०२० | नातू प्रतिष्ठान, गुहागर डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा | ६२ |
| १३. | ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२० | प्रभावी सादरीकरण | ४४ |
| १४. | २३ ते २६ नोव्हेंबर २०२० | अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी (AIILSG) डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा | ५१ |
| १५. | २३ आणि २४ जानेवारी २०२१ | मैत्री ट्विटरशी | ४० |

# ८. संशोधन व सरकारी प्रकल्प:

## ८.१ पोषण अभियान :

भारत सरकारचा कुपोषण निर्मूलन हा एक महत्त्वाचा कार्यक्रम असून प्रबोधिनीने 'पोषण जन अभियान' या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. उत्तर प्रदेशातील १५ जिल्ह्यांमध्ये हे अभियान योजण्यात आले. १५ स्वयंसेवी सस्थांच्या माध्यमातून याची कार्यवाही करण्यात आली. नीती आयोगाच्या मार्गदर्शनाखाली म्हाळगी प्रबोधिनीच्या इंडिया को-विन ॲक्शन नेटवर्कने (ICAN) उत्तर प्रदेशातून निवडलेल्या १५ जिल्ह्यांमध्ये 'पोषण जन अभियान' सुरू केले आहे. टाटा ट्रस्ट आणि मॅरिको इंडिया हे प्रकल्पाच्या सुरुवातीच्या सहा महिन्यांच्या कामकाजासाठी आर्थिक पाठबळ पुरवत आहेत. कुपोषणाचा सामना करण्यासाठी या जिल्ह्यांमध्ये सहा महिन्यांत निवडक हस्तक्षेप आणि उपाय करण्यात आले, त्या अनुभवांवर आधारित प्रकल्पाच्या कार्याचा मध्यवर्ती आढावा घेतला जाईल आणि पुढील दिशा ठरविली जाईल.

**केजीबीव्ही (कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय), आश्रम शाळा, नवोदय शाळांमधील बाल शोषण आणि दुर्बलता यावरील अभ्यास:**

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाद्वारे (एनसीपीसीआर) निवडक आश्रम शाळा आणि नवोदय शाळांमध्ये बाल शोषण आणि लैंगिक अत्याचार यावर सर्वेक्षण करण्यात आले. मार्च २०२० मध्ये सर्वेक्षणाचे निष्कर्ष आणि त्याचा अहवाल एन.सी.पी.सी.आर.ला देण्यात आला. जुलै २०२० मध्ये एन.सी.पी.सी.आर.ने अंतिम अहवाल प्रस्तुत केला.

## ८.२ राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग (एन.सी.पी.सी.आर.) :

भ्रमणध्वनी आणि इंटरनेटशी जोडल्या गेलेल्या उपकरणांचा लहान मुलांकडून वाढता वापर तसेच सध्याच्या कोरोना महामारीत सुरु असलेले आभासी वर्ग या पार्श्वभूमीवर "राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाने" (एन.सी.पी.सी.आर.) या सगळ्याच्या लहान मुलांवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करण्याचे ठरवले. यासाठी आयोगाने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीला "भ्रमणध्वनी आणि इंटरनेटशी जोडल्या गेलेल्या उपकरणांचा लहान मुलांवर होणार परिणाम" या विषयावर संशोधनात्मक अभ्यास करण्याची जबाबदारी सोपवली होती. अभ्यासादरम्यान भारतातील विविध पाच प्रांतांमधील पालक, तसेच सुमारे ६० शासकीय/ निमशासकीय/ खाजगी तसेच महानगरीय/ शहरी/ ग्रामीण शाळेतील लहान मुले आणि शिक्षक अशा सुमारे ५००० सहभागींना समाविष्ट करण्यात आले आणि याचा अहवाल आयोगाकडे सुपूर्द केला गेला.


एन.सी.पी.सी.आर.ने सर्वप्रकारच्या शाळांमधील लहान मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित विषयावर एक सर्वसमावेशक निर्देश पुस्तिका विकसित केली आहे. भारतातील शासकीय/ निम शासकीय/ खाजगी शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या पुस्तिकेतील मार्गदर्शक तत्त्वांचा अंगीकार करावा यासाठी एन.सी.पी.सी.आर.ने ADOPT - CSS (अ डिजिटल ऑनलाईन प्रोग्रॅम फॉर टीचिंग अँड नॉन टीचिंग स्टाफ ऑन चिल्ड्रनस् सेफ्टी इन स्कूल) हा कार्यक्रम विकसित केला आहे.

## ८.३ राजकीय साहाय्यक प्रमाणपत्र अभ्यासक्रम :

लोकप्रतिनिधींना विशेषतः आमदार वा खासदारांसोबत ज्यांना काम करायची इच्छा आहे, अशा युवकांसाठी प्रबोधिनीने गेल्या वर्षी राजकीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची शृंखला योजली होती. यात एकूण ७ कार्यक्रम झाले त्याचा तपशील पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | २७ - ३० एप्रिल, २०२० | ३२ | ०० | ३२ |
| २ | २७ - ३० एप्रिल, २०२० | ३२ | ०३ | ३८ |
| ३ | १३ -१६ मे, २०२० | ३२ | ०३ | ३५ |
| ४ | १३ -१६ मे, २०२० | ३५ | ०२ | ३७ |
| ५ | १५ -१८ मे, २०२० | २० | ०० | २० |
| ६ | १५ - १८ जून, २०२० | २९ | ०४ | ३३ |
| ७ | ५ - ८ जानेवारी, २०२१ | २० | ०५ | २५ |

या अभ्यासक्रमासाठी डॉ. विक्रांतसिंग तोमर, डॉ. महेशचंद्र शर्मा, डॉ. राकेश मिश्रा, बाला कामरसू, खासदार सी. आर. पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे, भाजपा राष्ट्रीय सचिव विनोद तावडे, भाजपा खासदार एस. पी. सिंघ बाघेल, खासदार अर्जुनलाल मीना, डॉ. शिवशक्ति बक्षी, रतन शारदा, प्रिया सावंत, नील सोमय्या, डॉ. स्वप्ना पाटकर, विशाखा कुलकर्णी, देवेंद्र पै, आणि रवींद्र साठे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.



## ८.४ नेतृत्व साधना – १२ व १३:

प्रबोधिनीने २०१२ पासून युवा वर्गासाठी नेतृत्त्व साधना हा उपक्रम सुरु केला. प्रतिवर्षी देशातील वेगवेगळ्या शहरांमध्ये याचे आयोजन होत असते. अहवाल वर्षात दोन आभासी वर्ग झाले. पहिल्या वर्षी भाजपाचे तत्कालीन राष्ट्रीय सचिव तरुण चुघ आणि दुसऱ्या वर्षी भाजपाचे तत्कालीन राष्ट्रीय सरचिटणीस भूपेंद्र यादव यांच्या मार्गदर्शनाने या दोन्ही अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाने या अभ्यासक्रमांचा समारोप झाला. त्याची माहिती पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | २६-३० मे, २०२० | ३५ | ०४ | ३९ |
| २ | ०२ - ०६ जून, २०२० | ३० | ०३ | ३३ |

या अभ्यासक्रमात डॉ. विक्रांत सिंग तोमर, खासदार अरविंद धर्मपुरी, श्रीकांत भारतीय, डॉ. भारती छिब्बर, प्रफुल्ल केतकर, अजित जोशी, प्रिया सावंत, शाझिया ईल्मी, हर्ष मल्होत्रा, नितीन गोखले, वकील आय. पी. पटेल, संतोष गुप्ता, देवांग दवे, डॉ. राजीव नयन, संजय टंडन, वीरेंद्र सचदेवा, रणजीत सांगळे, नूपुर शर्मा, डॉ. चंद्रचूर सिंघ, ब्रिगेडियर हेमंत महाजन आणि रवींद्र साठे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.

## ८.५ निवडणूक विश्लेषणामध्ये ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम :

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | जून २२-२६, २०२० | ४५ | ०८ | ५३ |
| २ | सप्टेंबर २२-२६, २०२० | ४० | ०३ | ४३ |

या अभ्यासक्रमात जय मृग, तरित प्रकाश, डॉ. अमरेश झा हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.



## ८.६ भाषणकला प्रशिक्षण शिबिर -

अहवाल वर्षात भाषणकला प्रशिक्षणाची दोन शिबिरे घेण्यात आली. ही आभासी शिबिरे प्रथमच हिंदीत झाली.दि. २६ ते २८ जून २०२० या कालावधीत पहिले भाषणकला प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन राकेश उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाने झाले. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. सुधांशु त्रिवेदी यांच्या उपस्थितीत समारोप झाला.

द्वितीय शिबिर दि. १५ ते १७ ऑगस्ट २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी आणि समारोप रवींद्र साठे यांनी केला.

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | जून २२-२६, २०२० | २२ | ०७ | २९ |
| २ | ऑगस्ट १५ - १७, २०२० | ३३ | ०४ | ३७ |

या शिबिरात मंदार भारदे, प्रमोद पवार, डॉ. आरती सूर्यवंशी, प्रिया सावंत, हितेश शंकर, डॉ. हरिता मारवाह आणि अजित जोशी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.

## ८.७ लोकनीतीचा परिचय (Introduction to Public Policy)

या अभ्यासक्रमाद्वारे लोकनीती संबंधित मुख्य संकल्पना आणि सिद्धांतांचा सहभागींना परिचय करून देणे हा उद्देश्य आहे. लोकनीतिविषयीचे सखोल ज्ञान होत असते, याची जाणीव सहभागींना करून देणे असा या उपक्रमाचा उद्देश होता. मैसूर येथील ग्राम संस्थेच्या सहयोगाने प्रबोधिनीने असे ४ वर्ग योजले. धोरणांची अंमलबजावणी वैयक्तिक मतांच्या आधारावर न होता माहिती व वस्तुस्थितीच्या आधारावर या आभासी प्रशिक्षणाची पहिली तुकडी दि. २ ते ६ जून २०२० दरम्यान घेण्यात आली. खासदार महेश पोद्दार यांनी या वर्गाचे उद्घाटन केले तर ज्येष्ठ विचारक राम माधव यांनी समारोप केला.

यातील दुसऱ्या तुकडीचे आभासी प्रशिक्षण दि. १३ ते १७ जुलै २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. रवींद्र साठे यांनी या वर्गाचे उद्घाटन केले तर डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी समारोप केला.

तिसरा आभासी प्रशिक्षण वर्ग दि. १७ ते २१ ऑगस्ट २०२० या कालावधीत घेण्यात आला. एनसीपीसीआरचे अध्यक्ष प्रियांक कानुंगो यांनी या वर्गाचे उद्घाटन केले तर पंचायतराज मंत्रालयाचे माजी सचिव जे. एस. माथुर यांनी समारोप केला.

या आभासी प्रशिक्षणाची चौथी तुकडी दि. २१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२० दरम्यान घेण्यात आली. डॉ. अनिर्बान गांगुली यांनी या वर्गाचे उद्घाटन केले तर डॉ. एस. सेल्वाकुमार यांनी समारोप केला.

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | जून ०२ - ०६, २०२० | ४५ | ०८ | ५३ |
| २ | जुलै १३ – १७, २०२० | २१ | २२ | ४३ |
| ३ | ऑगस्ट १७ - २१, २०२० | २१ | २२ | ४३ |
| ४ | नोव्हेंबर २१ -डिसेंबर ५, २०२० | २४ | ०८ | ३२ |

या अभ्यासक्रमात डॉ. आर बालसुब्रमण्यम, डॉ. अनन्या समजदार, डॉ. बसवराजू आर. हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.

## ८.८ स्वीय साहाय्यकांसाठी प्रशिक्षण-

उत्तर प्रदेशातील व मध्य प्रदेशातील आमदारांच्या स्वीय साहाय्याकांसाठी पुढील सहा प्रशिक्षण वर्ग योजण्यात आले. आमदार व खासदारांच्या स्वीय साहाय्यकांसाठी प्रबोधिनीने एक पाठ्यक्रम विकसित केला आहे. स्वीय साहाय्यकांना त्यांची भूमिका व जबाबदारीची जाणीव करून देणे आणि आपले काम अधिक प्रभावी करण्यासाठी व्यवस्थापन शास्त्राचा उपयोग कसा करता येईल याबद्दलची माहिती देणे, असा याचा उद्देश आहे. अहवाल वर्षात आभासी पद्धतीत असे ७ कार्यक्रम झाले.

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | जुलै २१ -२४, २०२० | २५ | ०० | २५ |
| २ | ऑगस्ट ०७ - १०,२०२० | ३३ | ०० | ३३ |
| ३ | सप्टेंबर ०९ - १२, २०२० | २० | ०० | २० |
| ४ | ऑक्टोबर १३ - १६, २०२० | २१ | ०० | २१ |

या अभ्यासक्रमात विक्रांत सिंग तोमर, कॅबिनेट मंत्री सतीश महाना, अशोक कटारिया, मंत्री डॉ. सतीश द्विवेदी, डॉ. शिवशक्ती बक्षी, विशाखा कुलकर्णी, स्वरूप शुक्ला, स्वाती सिंग, देवेंद्र पै आणि रवींद्र साठे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.

## ८.९ भारतीय संविधानाची ओळख:

या विषयावरील आभासी प्रशिक्षण वर्ग दि. २४ ते २७ नोव्हेंबर २०२० दरम्यान आयोजित करण्यात आला. विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ॲड.आलोक कुमार यांनी या वर्गाचे उद्घाटन केले तर मोनिका अरोरा यांनी समारोप केला.

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर २४-२७, २०२० | १९ | ०५ | २४ |

या शिबिरात डॉ. भारती छिब्बर, अमेय देशपांडे, महेश भागवत, ॲड. राजीव पांडे, ॲड. अभिलाषा माने हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.

### ८.१० राजकीय साहाय्यक प्रमाणपत्र अभ्यासक्रम, मध्य प्रदेश :

| अ.क्र. | दिनांक | पुरुष | महिला | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १ | फेब्रुवारी १६-१९, २०२१ | २४ | ०० | २४ |
| २ | मार्च २० - २३, २०२० | २० | ०० | २० |

या अभ्यासक्रमात डॉ. विक्रांतसिंग तोमर, आमदार अशोक रोहानी, आमदार राम डांगोरे, डॉ. सीताशरण शर्मा, अनिल सौमित्र, डॉ. शिवशक्ती बक्षी, विशाखा कुलकर्णी, देवेंद्र पै आणि रवींद्र साठे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले.

### ८.११ प्रबोधन

**ट्रान्सफॉर्मिंग इंडिया डायलॉग्ज- ११ वी मालिका**

ट्रान्सफॉर्मिंग इंडिया डायलॉगची (भारताच्या परिवर्तनावरील संवाद) अकरावी मालिका दि. २५ फेब्रुवारी २०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती. टीआयडीची ही पहिली आभासी आवृत्ती आहे. एन.सी.पी.सी.आर.चे अध्यक्ष प्रियांक कानुंगो हे प्रमुख वक्ते होते तर रवींद्र साठे सत्राचे अध्यक्ष होते. कानुंगो यांनी त्यांच्या कार्यकाळातील बाल हक्कांच्या क्षेत्रात झालेल्या प्रगती आणि कामगिरीची चर्चा केली. या चर्चासत्रात विविध शिक्षण संस्थांचे २५ हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## ९. भारतीय लोकतांत्रिक नेतृत्व संस्थान (आय.आय.डी.एल.)

**९.१** प्रबोधिनीच्या भारतीय लोकतांत्रिक नेतृत्व संस्थेनाच्या वतीने योजण्यात येणाऱ्या नेतृत्व, राजकारण आणि सुशासन विषयावरील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे हे चौथे वर्ष.

दि. २० सप्टेंबर २०२० रोजी आय.आय.डी.एल.ची चौथी तुकडी भारतीय जनता युवा मोर्चाच्या (भाजयुमो) तत्कालीन अध्यक्षा व लोकसभा खासदार पूनम महाजन यांच्या उपस्थितीत सुरू झाली. १२ राज्यांतून विविध पार्श्वभूमीच्या २६ विद्यार्थ्यांची नेतृत्व, राजकारण आणि राज्यकारभाराचे प्रशिक्षण देणाऱ्या या एक वर्षाच्या पदव्युत्तर कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली होती.

कोविड - १९ परिस्थितीत आलेल्या निर्बंधांमुळे नऊ महिन्यांचा हा अभ्यासक्रम वर्ग आभासी पद्धतीने सुरू झाला आणि जवळपास दोन महिने असाच सुरु राहिला. अखेर, दिवाळीच्या सुट्टीनंतर अर्थात नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात विद्यार्थ्यांना प्रबोधिनीमध्ये संकुलात बोलवून नियमित वर्ग सुरू झाले. दि. ३० नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ दरम्यान उत्तनमधील प्रबोधिनीच्या संकुलात कोविड - १९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीत पुन्हा एकदा आभासी पद्धतीने वर्ग भरवण्यात आले होते.

या वर्षी राजकीय क्षेत्र तसेच शैक्षणिक क्षेत्रातील आणि इतर विविध विषयांतील प्रख्यात तज्ज्ञ, वक्ते व मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यापैकी काही प्रमुख नावे पुढीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| १. | विहिपचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष अॅड. आलोक कुमार |
| २. | भाजपाचे राष्ट्रीय संघटक व्ही. सतीश |
| ३. | भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस. सी. टी. रवी |
| ४. | भाजपाचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे |
| ५. | माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी.एस. कृष्णमूर्ती |
| ६. | खासदार भर्तृहारी महताब कटक |
| ७. | भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते गुरु प्रकाश पासवान |
| ८. | भाजपाचे प्रदेशाध्यक्ष (महाराष्ट्र) चंद्रकांत (दादा) पाटील |
| ९. | उपविभागीय दंडाधिकारी, आयएएस अधिकारी (ओडिशा केडर) आशुतोष कुलकर्णी |
| १०. | उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल आणि माजी खासदार राम नाईक |
| ११. | इस्राईल दूतावासातील उप-काउन्सेल जनरल निम्रोद कलमार |
| १२. | आयसीसीआरचे अध्यक्ष आणि खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे |

| | |
|---|---|
| १३. | आमदार सौरभ श्रीवासत वाराणसी कॅन्ट. |
| १४. | आमदार मनीषा चौधरी, मुंबई |
| १५. | आमदार सिद्धार्थ शिरोळे, पुणे |
| १६. | कॅप्टन (सेवानिवृत्त) स्मिता गायकवाड |
| १७. | लेखक राधाकृष्णन पिल्लई |
| १८. | लेखक शंतनू गुप्ता |
| १९. | नगरसेवक नील सोमैया, मुंबई |
| २०. | टीजेएसबी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील साठे |
| २१. | नाबार्डचे सेवानिवृत्त उप-व्यवस्थापकीय संचालक एच. आर. दवे |
| २२. | गव्हर्नन्स नाऊ चे व्यवस्थापकीय संचालक, कैलाशनाथ अधिकारी |
| २३. | आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय सहसचिव रुबेन मॅस्कऱ्हेनस |
| २४. | राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाचे अध्यक्ष व माजी खासदार तरुण विजय |

### इतर अतिथींसोबत सुसंवाद

- सुप्रसिद्ध गायक कैलास खेर
- गीतकार मनोज मुंतशीर
- मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष आणि उद्योजक सुधीर मेहता

### अध्ययन दौरे:

या अभ्यासक्रमात सर्व विद्यार्थ्यांना घेऊन रायगड किल्ल्याची भ्रमंती आणि मुक्काम, जव्हारचा आदिवासी प्रदेश, उत्तन पोलिस स्टेशन, अटल स्मृती संग्रहालय या स्थळांना अभ्यासभेटी देण्यात आल्या.

## ९.२ अभिरूप संसद :

दि. १९ - २० फेब्रुवारी २०२० रोजी आयोजित केलेल्या ‘अभिरूप संसद’ मध्ये विद्यार्थ्यांनी संसदेचे अनुकरण केले. यामध्ये प्रश्नोत्तराचा तास, लक्षवेधी ठराव, भाषण, अर्थसंकल्प, चर्चा आणि विधेयकांवर मतदान यांचा समावेश होता. हिंदू मंदिरांना शासकीय नियंत्रणामधून मुक्त करणे, लोकसंख्या नियंत्रण, छोटी राज्य यांवर चर्चा तसेच ओटीटी नियमन विधेयक आणि आरक्षण कायद्यात सुधारणा अशा विविध विषयांवर चर्चा आणि मतदान झाले. देवेंद्र वर्मा (आमदार- खांडवा, मध्य प्रदेश) आणि रघुनंदन राव (आमदार - दुबक्का, तेलंगणा) हे उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

### ९.३ आसाम निवडणूक अभ्यास दौरा :

आसाममधील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी निवडणूक कार्यपद्धतीचा अभ्यास तसेच प्रचार मोहिमा आणि लढती यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी आसामचा दौरा केला. हे विद्यार्थी चार आठवडे आसाममध्ये राहिले. या दरम्यान त्यांना उमेदवारांच्या प्रचार मोहिमांचे नियोजन, प्रसारमाध्यम, निवडणूक कार्यालय व्यवस्थापन आणि पोलिटिकल इंटेलिजन्स अशा विविध शाखांमध्ये विभागलेले होते.

### ९.४ डेट विथ द बीच :

दि. १४ फेब्रुवारी २०२१ रोजी विद्यार्थ्यांनी 'डेट विथ द बीच ' या उपक्रमांतर्गत समुद्रकिनारा स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली. हे आयोजन विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासक्रमाची सत्र संपल्यानंतर राहिलेल्या वेळेत केले. ८५ स्वयंसेवकांनी गोराई समुद्रकिनारा साफ करण्याच्या या मोहिमेमध्ये सहभाग घेतला. प्रसिद्ध गीतकार मनोज मुंतशीर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

### ९.५ आस्वाद चित्रपट :

अभ्यासक्रमांत पुस्तक परीक्षण, चर्चा, सर्वेक्षण इ. बरोबर कला, साहित्य, सामाजिक प्रश्न या बद्दलची जाण विकसित होण्याकरिता काही चित्रपट आवर्जून दाखविले जातात. यंदा प्रधान मंत्री (१० भाग), बुद्ध इन ट्रॅफिक जॅम, एक रुका हुआ फैसला, कास्ट अवे, द ग्रेट हॅक, द कॅम्पेन, अँकरमन २ हे चित्रपट दाखविण्यात आले.

### ९.६ आय.आय.डी.एल – संख्यात्मक वृत्त

| | |
|---|---|
| एकूण व्याख्याने | ३४२ |
| प्रात्यक्षिक सत्रे | ६५ |
| एकूण विशेष मार्गदर्शक | २०३ |
| अध्ययन दौरे | ०४ |
| पाहिलेले चित्रपट | ०८ चित्रपट + १० भाग |

### अमेरिकन निवडणूक प्रक्रिया - माजी विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळा :

अमेरिकन निवडणुकीच्या आदल्या दिवशी इंडियन इंस्टिट्यूट ऑफ डेमोक्रॅटिक लीडरशिप - आयआयडीएल आणि अमेरिकन वाणिज्य दूतावास, मुंबई यांच्या सहकार्याने आयआयडीएलच्या माजी विद्यार्थ्यांसाठी 'यूएस निवडणूक प्रक्रिया आणि अमेरिकेतील प्रत्यक्ष वृत्तांताची चालवली जाणारी मोहीम' या विशेष कार्यशाळेचे आयोजन दि. १६ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत करण्यात आले होते. यूएस परराष्ट्र नीतीमध्ये निपुण असलेले अधिकारी ब्रॅड मीचम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते.

## आंतरराष्ट्रीय नेत्यांची प्रायोगिक बैठक – एम.आय.एल.एम:

आपापल्या देशाचे प्रतिनिधित्व करून विविध विषयांवरील आपले मत मांडून आपल्या देशाचा सहभाग दर्शवण्याच्या उद्देशाने एक प्रायोगिक आंतरराष्ट्रीय नेत्यांची बैठक आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. यामध्ये संपूर्ण भारतातील युवा नेते आणि देशांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी व्यासपीठ निर्माण करून विविध समस्यांकडे लक्ष वेधण्याचे कार्य या निमित्ताने केले गेले.

कोविड-१९ अजेंडा: "ग्लोबल रिस्पॉन्स" आणि "द वे अहेड" या दोन स्पर्धांचे आयोजन दि. २९-३० ऑगस्ट २०२० रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेच्या सहभागासाठी रु. ५०० इतके शुल्क आकारण्यात आले होते.

या स्पर्धेत १५ राज्यांमधील ७० प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. आयआयटी आणि आयआयएम यासारख्या काही प्रख्यात संस्थांचाही सहभाग होता. १५ वैयक्तिक बक्षिसे व २ महाविद्यालये यांनी सर्वोत्कृष्ट अष्टपैलू आणि उपविजेते म्हणून प्रत्येकी रु. ७५०० आणि रु. ५००० अशा रोख रकमेसहित बक्षिसे पटकावली.

‘कोविड-१९ नंतरच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलते कल’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. संयुक्त राष्ट्रांतील भारताचे कायम प्रतिनिधी माजी राजदूत असोक मुखर्जी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून कार्यक्रमाला उपस्थित होते. आयोजन समितीमध्ये अंजली पंडित, आदित्य वीरमणी, अटल पुरोहित, देवेंद्र पै, गंधार भांडारी, हरगुन कौर, हर्षद श्रोत्री, कल्याणी साठे, मृदुला नायक, रोहन महाजन आणि शुभम बत्रा यांचा समावेश होता. डॉ.रश्मिनी कोपरकर, डॉ कपिल चंद्रयान, अफरीन सिद्दिकी आणि अनय जोगळेकर इत्यादी मान्यवर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लाभले.

## विशेष उल्लेख -

पोलंड, निवेश शर्मा, सेंट फ्रान्सिस (मुंबई), सौदी अरेबिया, अनीश लोढा, डीजे संघवी (मुंबई), कॅनडा, भक्ती चव्हाण, न्यू लॉ कॉलेज (मुंबई), बहरीन, गौरव लुथ्रा, सिम्बायोसिस (नाशिक), दक्षिण कोरिया, डॉ. ओंकार देशमुख, प्रवरा वैद्यकीय महाविद्यालय पास-आउट (अहमदनगर), कोलंबिया, लक्ष्यशिखा पवार, एनएमआयएमएस (बेंगलुरू), इथिओपिया, श्रेय मल्होत्रा, पीडीएम विद्यापीठ (दिल्ली). सर्व सहभागी आणि कॅम्पस राजदूतांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

## उडान पाठ्यवृत्ती

मणिपाल एज्युकेशन अँड मेडिकल ग्रुप (एम.इ.एम.जी.) यांच्या सहकार्याने आय.आय.डी.एल. ने गेल्या वर्षीपासून उडान पाठ्यवृत्ती योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत देशभरातील राजकारण व समाजसेवेने प्रेरित झालेल्या ३० निवडक युवकांना वर्षभरासाठी पाठ्यवृत्ती दिली जाते.

एम.इ.एम.जी. कडून यासाठी आर्थिक पाठबळ मिळाले असून पाठ्यवृत्ती धारकांना दरमहा मानधन देण्यात येते. देशभरातून या योजनेसाठी अर्ज मागविण्यात येतात. अर्जांची छाननी करून त्यांतून सुयोग्य उमेदवार निवड समितीकडून निवडले जातात. या योजनेद्वारे , संबंधित तरुणांना राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, मन्वंत वैचारिक संस्थांशी आंतरक्रिया व प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. भारतातील ही अशा प्रकारची एकमेव राजकीय पाठ्यवृत्ती आहे.

या पाठ्यवृत्तीद्वारा युवकांचा आत्मविश्वास वाढतो त्यांच्या जाणिवा प्रगल्भ होऊन त्यांना राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी प्रोत्साहन मिळते.

अहवाल वर्षात सप्टेंबरमध्ये १६ राज्यांतील ३० जणांना पाठ्यवृत्ती देण्यात आली. यांत १० महिलांचा समावेश आहे. राजकीय पक्षांचे नेते, केंद्रीय मंत्री, आमदार, खासदार यांच्याबरोबर नीती आयोगासारख्या संस्थांसमवेत हे युवक काम करीत आहेत.

## १०. ज्ञान-नैपुण्य केंद्र :

गेल्या अनेक वर्षांपासून विविध व्यावसायिक संस्था त्यांच्या अंतर्गत प्रशिक्षण, उपक्रम आणि कार्यक्रमांसाठी प्रबोधिनीच्या केशव सृष्टी, भाईंदर (प.) येथील ज्ञान नैपुण्य केंद्राला प्राधान्य आणि पसंती देत आहेत. १५ एकरच्या या निसर्गरम्य परिसरात निवासी प्रशिक्षणासाठीच्या व तत्सम उपक्रमांसाठीच्या अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. याचबरोबर महत्त्वाच्या बैठकांसाठी, अंतर्गत प्रशिक्षणासाठी वा तत्सम उपक्रमांसाठी सुयोग्य स्थान अशी व्यावसायिक जगतात ज्ञान-नैपुण्य केंद्राची स्वतंत्र ओळख निर्माण होत आहे. त्यामुळेच प्रतिवर्षी व्यावसायिक व सामाजिक संघटनांकडून ज्ञान-नैपुण्य केंद्राचा उपयोग विविध उपक्रमांसाठी करण्याचे प्रमाणही सातत्याने वाढत आहे. अहवाल वर्षात ज्या प्रमुख संस्थांनी संकुलाचा वापर केला त्या पुढीलप्रमाणे.

**व्यावसायिक संस्था:** ट्रायटेक असोसिएटस, अभिजीत प्रतिष्ठान, ब्रह्मदिव्या साधना केंद्र, निराकरण इन्फ्रा, श्रीधूतपापेश्वर लिमिटेड

**सामाजिक संस्था:** खुला आसमान ट्रस्ट, अमृतवाणी सत्संग, पेण नगर परिषद शिक्षण विभाग, तर्पण फाउंडेशन, बोधमार्ग फाउंडेशन, सेवा सहयोग फाउंडेशन.

## ११. अटल प्रतिभा पोषण केंद्र:

भारतातील नवोदित स्टार्ट अप्सना उद्योगवृद्धीमध्ये साहाय्य करण्यासाठी नीती आयोगांतर्गत असलेल्या अटल इनोव्हेशन मिशन आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने जानेवारी २०१९ मध्ये अटल प्रतिभा पोषण केंद्राची  स्थापना करण्यात आली. सध्या कृषी, माहिती व तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रांतील ३० पेक्षा अधिक स्टार्ट अप उद्योगांना केंद्राद्वारे मार्गदर्शन आणि विविध प्रकारचे साहाय्य पुरवले जात आहे.

### ११.१ स्टार्ट अप्सच्या द्वितीय गटाची निवड :

यावर्षी केंद्राला भारतातील २० पेक्षा अधिक राज्यांतून १४० स्टार्ट अप उद्योजकांचे अर्ज प्राप्त झाले. निवडप्रक्रियेच्या विविध फेऱ्यांत २० तज्ज्ञ मार्गदर्शकांचा सहभाग होता. या मूल्यांकनामधून केंद्राच्या इन्क्युबेशन कार्यक्रमाच्या द्वितीय गटासाठी १३ स्टार्ट अप उद्योगांची निवड करण्यात आली.

दि. ८ ऑगस्ट २०२० रोजी या नव्या उद्योजकांसाठी एक आभासी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आर. रमणन (मिशन डायरेक्टर, अटल इनोव्हेशन मिशन, नीती आयोग) हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी अटल इनोव्हेशन मिशनच्या अंतर्गत येणाऱ्या योजनांची माहिती, भारतातील स्टार्ट अप परिसंस्थेचा परिचय करून दिला. आणि उद्योजकांना अशा इन्क्युबेशन केंद्राचा आपल्या उद्योग वृद्धिंगत करण्यासाठी कसा लाभ करून घेता येईल याविषयी मांडणी केली. केंद्राचे संचालक रवींद्र साठे, जय मृग, किरीट भन्साळी हे देखील या कार्यक्रमास उपस्थित होते.

दि. २९ ऑगस्ट २०२० रोजी आभासी पद्धतीने आयोजित केलेल्या "मीट अँड ग्रीट" या कार्यक्रमाद्वारे द्वितीय गटातील या नवउद्योजकांचा केंद्राच्या प्रथम गटातील स्टार्टअप उद्योजक तसेच मार्गदर्शक, विशेषज्ञ आणि भागीदार यांच्यासोबत परिचय करून देण्यात आला. या कार्यक्रमात मिलिंद अत्रे (प्राध्यापक - यांत्रिक अभियांत्रिकी आणि केंद्रप्रमुख, 'आर अँड डी' औद्योगिक संशोधन व सल्लामसलत – आय.आय.टी. मुंबई) यांचे "मेंटरिंग आणि नेटवर्किंग - नवउद्योगांच्या यशाची गुरुकिल्ली" या विषयावर अभ्यासपूर्ण विवेचन झाले.

## ११.२ केंद्राची नवी अकादमी:

नवउद्योजकता आणि नावीन्यपूर्ण स्टार्टअप या क्षेत्रात सहभागी असलेल्यांना प्रोत्साहन आणि योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी जून २०२० मध्ये केंद्रांतर्गत नव्या अकादमीची सुरवात करण्यात आली. या अकादमीद्वारे अनेक महत्त्वपूर्ण आणि सर्वसमावेशक असे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम आयोजित करण्यात येतात. यांमध्ये नावीन्यपूर्ण उद्योगांसंदर्भात मूलभूत माहिती असलले विद्यार्थी, महत्त्वाकांक्षी उद्योजक, प्रारंभिक अवस्थेतील स्टार्टअप- मिळविण्यास उत्सुक, व्यावसायिक, महाविद्यालयीन प्राध्यापक तसेच इतर खाजगी क्षेत्रातील व्यक्तींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

**१.** या अकादमीच्या माध्यमातून जून आणि जुलै २०२० मध्ये उद्योजकांसाठी स्टार्टअप संदर्भातील मूलभूत संकल्पनांवर आधारित अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या घेण्यात आल्या. यामध्ये एकूण ३५ जणांनी सहभाग घेतला. प्रत्येकी १६ तासांची आभासी सत्रे घेण्यात आली.

**२.** जुलै-ऑगस्ट २०२० मध्ये केंद्राने मॅथवर्क्स इंडिया यांच्यासोबत मिळून 'बिझ-टेक बूटकँप' चे आयोजन केले होते. या ८ तासांच्या आभासी सत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि इंटरनेट ऑफ थिंग्स याविषयांशी निगडित काम करण्याऱ्या सुमारे २५ स्टार्टअप उद्योजक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**३.** दि. २२ सप्टेंबर २०२० रोजी ओरिजीन आय पी सोल्युशन्स यांच्यासह केंद्राने "इनोव्हेशन आणि आय पी स्ट्रॅटेजीज्" (नावीन्यपूर्ण निर्मिती आणि बौद्धिक संपत्तीविषयक कायदे आणि हक्क) या विषयावर एक आभासी चर्चासत्र आयोजित केले होते. या विषयात आवड असणाऱ्या २५ व्यक्तींनी सहभाग घेतला.

**४.** सप्टेंबर २०२० मध्ये अकादमीमार्फत १० तासांच्या आभासी पद्धतीने प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे (एफ. डी. पी) आयोजन करण्यात आले होते. प्राध्यापकांना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची बीजे रोवून त्यांच्यासाठी स्टार्टअप उद्योगासंदर्भातील मूलभूत संकल्पनांवर आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती करता यावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश्य होता. अखेरच्या सत्रास सन्माननीय अतिथी म्हणून डॉ. मोहित गंभीर (इनोव्हेशन संचालक- शिक्षण मंत्रालय, इनोव्हेशन सेल, भारत सरकार) हे उपस्थित होते. २८ प्राध्यापक त्यामध्ये सहभागी झाले होते.

या व्यतिरिक्त झालेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे-

| क्र. | दिनांक | विषय | उपस्थिती | वक्ता |
|---|---|---|---|---|
| १. | ४ नोव्हेंबर २०२० | स्टार्ट अप उद्योजकांसाठी कार्यशाळा | २३ | स्वानी रामचंदानी |
| २. | १८ डिसेंबर २०२० | मॅथवर्क्स इंडिया सोबत ऑनलाईन परिसंवाद | ६० | रामानन रामनाथन |
| ३. | ५-६ फेब्रुवारी २०२१ | स्टार्ट अप उद्योजकांसाठी निवासी कार्यक्रम | २४ | विकास भाटिया |

## १२. स्नेहसेतू

प्रबोधिनीच्या आजवरच्या वाटचालीत विविध उपक्रम सुरु झाले. गेल्या ४० वर्षात आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये ज्यांचा सहभाग होता अशा सर्वांना जोडण्यासाठी ‘स्नेहसेतू नावाने वेबसाईट पोर्टल व ॲपची निर्मिती करण्यात आली. या पोर्टलचा उद्देश सर्व सहभागी, हितचिंतकांची पुरेशी माहिती उपलब्ध करून देणे व त्यांच्याशी संपर्क (नेटवर्किंग) निर्माण करणे हाच आहे.

या पोर्टलचे ऑनलाईन उद्घाटन भाजपा चे राष्ट्रीय अध्यक्ष  जगत प्रकाश नड्डा यांच्या हस्ते दि. २५ जुलै २०२० रोजी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी देशभरातून विविध कार्यक्रमातील सहभागी, हितचिंतक सहभागी झाले होते. पुढील काळात जास्तीत जास्त सहभागींना या व्यासपीठाशी जोडून घेणे आणि त्यांना प्रबोधिनीमधील अद्ययावत माहिती देणे यासाठी काम केले जाणार आहे.

## १३. इंडिया कोविन ॲक्शन नेटवर्क (India Cowin Action Network) -

एप्रिल २०२० मध्ये करोना बाधित, त्याची झळ पोचलेले नागरिक तसेच या संकटाच्या काळात स्वेच्छेने मदत करू इच्छिणाऱ्या संस्था, त्यांचे कार्यकर्ते यांचा एकत्रित सहभाग असलेल्या एका वेब पोर्टलची निर्मिती दिल्लीस्थित ’कनेक्टिंग ड्रिम्स फाउंडेशन’ या संस्थेबरोबर केली. या पोर्टलवर मदत हवे असलेले, मदत करणारे यांची नोंद करण्यात आली.

पोर्टलच्या माध्यमातून चार लाख व्यक्तीपर्यंत मदत पोचविण्यात आली. यामध्ये मुख्यत्वे भोजन, औषधे व प्रवासासाठी मदत करण्यात आली. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या कामाची दखल नीती आयोगाने घेतली व कार्याचे कौतुक केले. ICAN च्या पोर्टल वर ३४०० संस्था व ४०००  हून जास्त स्वयंसेवकांनी नोंदणी केली होती.

दरम्यानच्या काळात ICAN च्या माध्यमातून नवनवीन उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. त्यात नीती आयोग, राष्ट्रीय बाल आयोग यांचे सहकार्य मिळत आहे. यात ICAN वेलनेस, प्रेरक, पोषण, युवा फॉर आत्मनिर्भर भारत याचा समावेश आहे. भविष्यातही विविध उपक्रम ICAN माध्यमातून करण्याचा मानस आहे.

‘ICAN वेलनेस’ च्या माध्यमातून ३७ कार्यक्रम आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आले, त्यात प्रामुख्याने मानसिक आरोग्यासाठी तणाव व्यवस्थापन, सकारात्मक विचार व आनंदी जीवन या विषयावर विविध मान्यवर व्यक्तींनी मार्गदर्शन केले.

'ICAN प्रेरक' च्या माध्यमातून १८ कार्यक्रम आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आले. सरकारी योजना या लाभार्थींपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. यात सरकारी अधिकारी, या विषयातील तज्ज्ञ व्यक्ती व सामजिक संस्थानीही सहभाग घेतला होता.

'ICAN युवा फॉर आत्मनिर्भर भारत' माध्यमातून भारतातील तरुणांमध्ये बदल घडवणाऱ्यां व्यक्ती, संस्थांना एकत्र करून त्यांच्या मदतीने आत्मनिर्भर भारत (Y4AB) साठी चळवळ सुरु करण्यात आली. तरुणांसाठी नवीन उत्पन्नाच्या संधी निर्माण करून किंवा चांगल्या उपजीविकेसाठी रोजगाराची कौशल्ये वाढवून तरुणांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणू इच्छितात, अशा उत्साही लोकांचा समूह, (गट) तयार करणे हेच Y4AB या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

प्रबोधिनीची व्यवस्थापन समिती व वार्षिक सर्वसाधारण सभा यांच्या बैठका खालीलप्रमाणे झाल्या,

| क्र. | बैठकीचे नाव | दिनांक | बैठकीचे स्वरूप | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापन समिती | १४ मे २०२० | आभासी | ८ |
| २ | व्यवस्थापन समिती | ७ नोव्हेंबर २०२० | आभासी | ८ |
| ३ | व्यवस्थापन समिती | २२ जानेवारी २०२१ | आभासी | ६ |
| ४ | विशेष वार्षिक सर्व साधारण सभा | १३ मार्च २०२१ | चंचल कार्यालय,मुंबई | १६ |

## आदरांजली

प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे माजी सदस्य व भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार आणि माजी प्रदेश संघटनमंत्री धरमचंद चोरडिया यांचे दि. १० मार्च २०२१ रोजी निधन झाले. चोरडिया मूळचे धुळ्याचे. जनसंघ युवक आघाडीमध्ये त्यांनी सुरुवातीला काम केले होते. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, उत्तमराव पाटील या मंडळींसोबत पक्ष संघटनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली होती. १९९० च्या दशकात ते महाराष्ट्र भाजपाचे संघटनमंत्री होते. याच काळात विधान परिषदेवर आमदार म्हणून त्यांना संधी मिळाली होती. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रश्नांबद्दल त्यांचा विशेष अभ्यास होता.

## आमची उपलब्ध प्रकाशने

| प्रकाशनाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| संघटनशास्त्र ( पाचवी आवृत्ती ) | संपादन : डॉ. विनय सहस्रबुद्धे | १००.०० |
| समीक्षा संचित (निवडक इंग्रजी ग्रंथांच्या परीक्षणांचे संकलन) | लेखक : ज.द.जोगळेकर<br>संपादन : रवींद्र साठे | ३००.०० |
| नागरिकत्व सुधारणा कायदा – २०१९ : भ्रम आणि वास्तव | अतुल भातखळकर | १०.०० |
| डाव्यांची ढोंगबाजी : भ्रष्टाचार,हिंसाचार आणि दंडुकेशाही | माधव भांडारी | ७५.०० |
| आयसिसचा उद्रेक आणि त्याचे महाराष्ट्रावरील परिणाम | मधुबन पिंगळे | ६०.०० |
| बाळासाहेब देवरस : कर्तृत्व आणि विचार | भय्याजी जोशी | २५.०० |
| गोदापरिक्रमेची फलश्रुती :<br>धरणातील पाण्याचे व्यवस्थापन आणि पूरनियंत्रण | संकलन : केशव उपाध्ये | ३०.०० |
| लोकनीतीचे उपासक : लोकनायक जयप्रकाश | मिलिंद बोकील | २०.०० |
| छत्तीसगडमधील अंतर्गत सुरक्षितता आणि विकास :<br>नक्षलवादी चळवळीचे परिणाम | अभ्यास अहवाल | २५.०० |
| भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी ?<br>( आवृत्ती : मराठी / हिंदी / इंग्रजी ) | अमित शाह | २५.०० |
| राजनीति के उस पार (चतुर्थ आवृत्ती ) | संपादन : सुधीर नादगांवकर | १५०.०० |
| संगठन कौशल ( द्वितीय आवृत्ती ) | संपादन : डॉ.विनय सहस्रबुद्धे | १५०.०० |
| सांस्कृतिक राष्ट्रवाद के शिल्पी | अमित शाह | ६०.०० |
| Al-Qaeda (Global Terror Incorporated) | Sudhakar Raje | ५०.०० |
| Left Front Rule in West Bengal<br>(Genesis Growth And Decay) | Dr. Ashok Modak<br>Atul Bhatkhalkar | ४०.०० |
| Development and Internal Security in Chattisgarh:<br>Impact of Naxalite Movement | - | ३०.०० |
| Creativity in Cooperation ( Four Success Stories) | Niranjan Welankar<br>Ravi Pokharna | ४०.०० |
| War On Terrorism<br>( A Compilation of Seminar Papers) | Editor: Ravindra Sathe<br>Milind Arolkar | ३०.०० |
| Understanding Human Computer:<br>System And Software | Arvind Rege | १२०.०० |
| Including The Excluded<br>(A Study of the Impact of Contract Labour Act 1970) | S.M.Dharap | १५०.०० |
| The National Cause<br>(selected writings of S. G. Majgaonkar ) | S.G.Majgaonkar | २००.०० |
| Architects Of Cultural Nationalism | Amit Shah | ६०.०० |

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

## एक दृष्टीक्षेप

**स्थापना : १९ ऑक्टोबर १९८२**

हेतू : सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात स्वयंसेवी वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षणाची रचना उत्पन्न करणे.

*विविध उपक्रम:* प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा, दिशादर्शन शिबिरे यांचे आयोजन.

*वैचारिक उपक्रम:* चर्चासत्रे, परिसंवाद, व्याख्यनमाला, अभ्यासमंडळे, पुस्तक प्रकाशन, संशोधनपर व सक्षम पाहणी प्रकल्प.

**विविध कक्ष:**

- **संदर्भ माहिती आणि प्रलेखन केंद्र - १९९०**
  देश- विदेशातील वृत्तपत्रे, मासिके , नियतकालिके यांमधून ३५ निवडक विषयांवर अभ्यसनीय व संदर्भ असलेला मजकूर कात्रण स्वरूपात पाठविणारी पाक्षिक सेवा.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासकेंद्र ग्रंथालय- १९९३**
  सुमारे १६,४३३ ग्रंथ ३६०० संदर्भ पुस्तके , सामाजिक व राजकीय विषयांवरील ७०० ध्वनिफिती व चित्रफिती २२७ व ७५० सीडीचा दृक - श्राव्य विभाग.

- **मानवाधिकार अध्ययन व जाणीव जागृती केंद्र – २००२**
  अधिक जागरूकता, संशोधन आणि कागदपत्रे याद्वारे मानवी हक्कांना खऱ्या सार्वजनिक चिंतनाचा विषय बनविण्याचे एक केंद्र.

- **आर.एम.पी. इंटरनॅशनल (आंतरराष्ट्रीय कक्ष)- २००२**
  सांस्कृतिक स्नेहबंधातून आंतरराष्ट्रीय सामंजस्य हे मुख्य सूत्र धरून काम करणारा मंच.

- **विलासराव साळुंखे अध्यासन केंद्र - २००३**
  पाणी प्रभावी प्रशासनासाठी निवडलेल्या प्रतिनिधी आणि नागरी संस्था यांच्या क्षमता वाढवण्याचे व्यासपीठ.

- **संस्था बांधणी व नेतृत्व अध्ययन केंद्र - २००८**
  निकोप संस्थाजीवन व वैज्ञानिक पद्धतींची संघटनात्मक रचना यांसाठी निर्माण झालेली उपक्रमांची शृंखला मुख्यतः शिक्षण व सहकार क्षेत्रातील संस्थाचा सहयोग.

- **नेतृत्व विकास केंद्र : २०१०**
  सर्वसामान्य नागरिकांपासून ते व्यावसायिक जीवनात नेतृत्व करण्यापर्यंत सर्वांसाठी व्यावहारिक नेतृत्वाचे धडे देणारा कक्ष.

- **भारतीय लोकतांत्रिक नेतृत्व संस्थान (आय.आय.डी.एल.)- २०१७**
  पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व, राजकारण आणि सुशासन या विषयावरील अभ्यासक्रम.



**मुंबई कार्यालय (नोंदणीकृत)**
१७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, वडाळा,
मुंबई – ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २४१३ ६९६६ /
२४१८ ५५०२ / २४१५ ६७२५
ई मेल -rmpchanchal@rmponweb.org

**ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)**
केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम)
जि. ठाणे – ४०१ १०६, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३ / ६
ई मेल -samparka@rmponweb.org

**दिल्ली कार्यालय**
१३६ नॉर्थ एव्हेन्यू, नवी दिल्ली – ११००११
दूरध्वनी : +९१ – ११ – २३०९ २०३२
ई मेल -rmpdelhi@rmponweb.org

**पुणे कार्यालय**
६२६, नारायण पेठ, लोखंडे तालीम शेजारी,
पुणे – ४११ ०३०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २० – २४४७ ३२७१
ई मेल -cibls@rmponweb.org

samparka@rmponweb.org   www.rmponweb.org   www.knowledgeexcellencecentre.com
f/rmponweb.org   @rmponweb   rmponweb

Millenium Arts, Mumbai